# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२०४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.९ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## धुसफूस चव्हाट्यावर येऊ देऊ नका शाहंच्या महायुतीतील नेत्यांना कडक सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई**

महायुतीतील धुसफूस चव्हाट्यावर येऊ नये, जाहीर वाद टाळावेत, अशा कडक सूचना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी (दि.८) महायुतीच्या नेत्यांना केल्या आहेत. लोकसभा निवडणुकीत झालेल्या ज्या चुकांमुळे अपयश आले, त्या टाळण्याच्या सूचना शहा यांनी केल्याचे सूत्रांनी सांगितले. शहा यांच्या अध्यतेखाली सह्याद्री अतिथीगृहावर बैठक पार पडली. त्यावेळी शाहंनी वरील सूचना केल्या आहेत.

सह्याद्री अतिथीगृहावर पार पडलेल्या बैठकीत शाहंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर महत्वाच्या बाबींवर चर्चा केली. यावेळी त्यांनी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या नेत्यांनी संयम ठेवावा आणि एकजूट असल्याचे चित्र जनतेसमोर जाईल, याची काळजी घ्यावी असे शाहंनी सांगितले आहे.

**जिंकून येणारे उमेदवार निश्चत करा**

शाहंनी मार्गदर्शन करताना काही निकषांच्या आधारे जागावाटप करण्याच्या आणि जिंकून येण्याची क्षमता असलेले योग्य उमेदवार निश्चित



करण्याच्या सूचनाही शाह यांनी दिल्या आहेत. मराठवाड्यासह काही भागात मराठा आरक्षणाचा भाजपला मोठा फटका बसला. संविधान बदलाची चर्चा, कांदा निर्यातबंदीसह काही बाबींमुळे लोकसभा निवडणुकीत पराभव झाला. विधानसभा निवडणुकीत या बाबींकडे काटेकोरपणे लक्ष देण्याबाबत बैठकीत चर्चा झाल्याचेही सांगितले जात आहे.

**अमित शाहंच्या दौऱ्यात दादांची अनुपस्थिती**

ऐन विधानसभांच्या तोंडावर महायुतीत जागा वाटपावरून तिढा निर्माण झाला असून, या सर्व घडामोडींमध्येच शाह दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर आले आहे. असे असतानादेखील काल सह्याद्री अतिथीगृहावर भाजपच्या कोअर कमिटीची बैठक पार पडली. शाह दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर असतानाहीदेखील एकट्या एकनाथ शिंदेंनीच शाहंची भेट घेतल्याचे पाहण्यास मिळाले. मात्र, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अद्याप शाहंची भेट घेतली नाही. त्यामुळे अजित पवार महायुतीत नाराज आहेत का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

**अजितदादा शाहंची विमानतळावर घेणार भेट?**

एकीकडे अजित पवार हे मुंबईत असूनदेखील त्यांनी अमित शाहंची भेट न घेतल्याने अनेक चर्चांना उधाण आले असून, अजित पवार अमित शाहंना मुंबई विमानतळावर भेट घेणार असल्याचे सांगितले जात आहे. शाह आणि महायुतीच्या नेत्यामध्ये विमानतळावर बैठक पार पडणार आहे. या बैठकीस राष्ट्रवादीकडून अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे आणि प्रफुल पटेल उपस्थित राहणार असल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय या बैठकीला देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे आणि एकनाथ शिंदे हेदेखील उपस्थित राहणार आहेत.

## अजितदादा आमचे कॅप्टन, मध्येच शस्त्र टाकू शकत नाही; बड्या नेत्यानं भरला विश्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नाशिक**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अन् राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती मतदार संघातून निवडणूक न लढवण्याचे संकेत दिल्याने राज्यातील राजकारणात खळबळ माजली आहे. मात्र, आता राष्ट्रवादीच्या बड्या नेत्याने अजितदादा मध्येच शस्त्र टाकू शकत नाही ते निवडणूक लढविणार असा विश्वास छगन भुजबळ यांनी व्यक्त केला आहे. तर दुसरीकडे उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनी अजित पवार हे बारामतीतून निवडणूक हरणार, हे निश्चित आहे. त्यांनाही याची कल्पना असल्याचे म्हटले आहे.



भुजबळ म्हणाले की, अजित पवार आमच्या ग्रुपचे कॅप्टन असून, ते मध्येच शस्त्र टाकू शकत नाहीत. ते निवडणूक लढविणारच असून, दादांनी लोकसभा निवडणुकीत जे झाले त्याबाबत व्यथा मांडल्याचे भुजबळ म्हणाले.देशाचे गृहमंत्री अमित शहा मुंबईत आले आहेत. त्यांनी वाद निर्माण करू नका, हे सांगणे स्वाभाविक आहे. कोणताही नेता हेच सांगणार आहे. आधी विजय संपादन करा, असे भुजबळ यांनी म्हटले. मुंबईत जगातील जास्तीत जास्त गणेश उत्सवाचे कार्यक्रम होतात असेही भुजबळ म्हणाले. महायुतीच्या तिन्ही घटकांना चांगले यश मिळवायचे असेल तर त्यांनी एकमेकांवर वक्तव्य करू नये विरोधकांना खाद्य देऊ नये अशा सूचनाही मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या असल्याचे भुजबळ म्हणाले.

## नागपुरात भिकारी गोळा केले आलिशान गाडीत बसवले आणि थेट भिखाऱ्यांसाठी राष्ट्रीय भिकारी मुक्त भारत अभियानअंतर्गत सहलीचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ नागपूर**

रस्त्यावरचे भिकारी म्हणजे कायमच उपेक्षेचा विषय. अपमान, हेटाळणी हे जणू त्यांचे प्रारब्धच. पण, नागपुरात मात्र जरा वेगळे घडले. या असाहाय्य जीवांना सन्मानाने एकत्र करुन तीर्थाटन घडवण्यात आले. नागपुरातील विविध भागातील रस्त्यावर कुणी असाहाय्य चेहरा समोर करून भीख मागतो, कुणी पाठीवर झोळीमध्ये लेकरू घेऊन रस्तोरस्ती भीख मागत फिरतो तर काही वयोवृद्ध भिखारी मंदिराच्या किंवा रस्त्यावरील फुटपाथवर भीख मागत फिरत असतात. गेल्या काही वर्षांत शहरातील विविध भागात भीख मागणाऱ्या भिकाऱ्यांची संख्या वाढली आहे. अशा विविध भागातील ५० भिखाऱ्यांसाठी राष्ट्रीय भिकारी मुक्त भारत अभियानअंतर्गत सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

एका आलिशान गाडीत या सर्व भिकाऱ्यांना रामटेकमधील रामधामची सहल घडवून आणल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर वेगळा आनंद दिसून आला. रस्त्यावर भीक मागून जगणाऱ्यामध्ये असलेल्या मानसिकेत बदल घडवा यासाठी राष्ट्रीय भिकारीमुक्त भारत उपक्रमाअंतर्गत विविध उपक्रम राबविले जातात. त्यातील हा एक उपक्रम आहे, नागपुरातील विविध भागात भीक मागणाऱ्या ५० वयोवद्ध असलेल्या भिकाऱ्यांना एका आलिशान डबल डेकर एसी बसमधून रामटेकला सहलीसाठी नेण्यात आले. त्या ठिकाणी त्यांना तो परिसर दाखवत त्यांच्या जेवणाची व्यवस्था केली. जवळपास दोन ते अडीच तास त्या ठिकाणी वेळ घालवत सहल पुन्हा नागपुरात परतली त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर वेगळा आनंद दिसत होता.भिकाऱ्यांनासुद्धा मुख्य प्रवाहात आणावे. त्यांच्या जीवनातसुद्धा आनंदाचे क्षण यावे आणि त्यांनासुद्धा माणूस म्हणून जगता यावे यासाठीचा हा प्रयत्न असल्यामुळे हा उपक्रम संस्थेतर्फे राबविला जातो. यावेळी माजी खासदार विकास महात्मे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून बस सहलीसाठी रवाना करण्यात आली.

## वडेट्टीवार यांना पराभूत करा, कॉंग्रेस खासदाराचे अप्रत्यक्ष आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९चंद्रपूर**

ब्रम्हपुरी विधानसभा मतदारसंघ असो की गडचिरोली, या दोन्ही ठिकाणी अल्पसंख्यांक समाजाचे लोक प्रतिनिधित्व करीत आहेत. ही परंपरा आता खऱ्या अर्थाने बदलण्याची वेळ आली आहे, असे म्हणत काँग्रेस खासदार प्रतिभा धानोरकर व भाजप आमदार परिणय फुके यांनी काँग्रेस नेते व विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार



यांचे नाव न घेता त्यांना विधानसभा निवडणुकीत पराभूत करण्याचे आवाहन कुणबी महाधिवेशनात केले.

ब्रम्हपुरी येथे हे अधिवेशन झाले. वडेट्टीवार हे अल्पसंख्यांक समाजाचे प्रतिनिधित्व करतात हे येथे उल्लेखनीय. रविवारी ८ सप्टेंबर रोजी ब्रम्हपुरी येथे झालेल्या कार्यक्रमाला चंद्रपूर - वणी - आर्णी लोकसभा मतदारसंघाच्या खासदार तथा वडेट्टीवार यांच्या काँग्रेस पक्षातील विरोधक प्रतिभा धानोरकर, भाजप आमदार परिणय फूके यांच्यासह कुणबी समाजातील नेते उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना खासदार प्रतिभा धानोरकर यांनी वडेट्टीवार यांचे नाव न घेता त्यांना ब्रम्हपुरी विधानसभा मतदारसंघातून पराभूत करा, असे आवाहन केले.काही वर्षे ब्रह्मपुरी आणि गडचिरोलीत बहुसंख्य समाजाचे प्रतिनिधित्व अल्पसंख्य समाजाचे लोक करीत आहेत, ही परंपरा बदलण्याची हीच खरी वेळ आहे. कुणबी समाज काही राजकारणी लोकांच्या भूलथापांना बळी पडतो. आगामी विधानसभा निवडणुकीत हे चित्र बदला, असे आवाहन धानोरकर यांनी केले. वडेट्टीवार यांच्यावर त्यांच्याच मतदारसंघात त्यांच्याच पक्षाच्या खासदारांनी टीका केल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## समृद्धी महामार्ग पुण्याला जोडणार, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९पुणे**

पुणे : समृद्धी महामार्ग पुण्याला जोडला जाणार आहे. पुणे आणि शिरूर दरम्यान प्रस्तावित असलेला ५३ किलोमीटरचा सहा पदरी उड्डाण मार्ग अहमदनगर आणि छत्रपती संभाजीनगरमार्गे समृद्धी महामार्गाला जोडण्यात येणार आहे. यासंदर्भातला निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलाय. पुण्याजवळील केसनंद गावातून या उड्डाण मार्गाची सुरुवात होणार आहे. त्यासाठी ७५१५ कोटी रुपये खर्च येणार आहे. राज्य




मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या पुणे - शिरूर - अहमदनगर राज्य महामार्गाला समांतर पद्धतीने नव्या सहा पदरी उड्डाण मार्गाची निर्मिती करण्यात येणार आहे .

**महामार्गाची एकूण लांबी २५० किलोमीटर**

पुण्याजवळील केसनंद गावातून या उड्डाण मार्गाची सुरुवात होणार असून ५३ किलोमीटरचा हा उड्डाणमार्ग शिरूरपर्यंत पोहचणार आहे . त्यासाठी ७५१५ कोटी रुपये खर्च येणार आहे . मात्र आता हा प्रस्तावित उड्डाणमार्ग पुढे अहमदनगर आणि तिथून पुढे छत्रपती संभाजी नागरमार्गे समृद्धी महामार्गाला जोडण्याचा निर्णय घेण्यात आलाय . त्यासाठी आणखी २०५०कोटी रुपये खर्च येणार असून एकूण खर्च ९५६५रुपये इतका येणार आहे . या महामार्गाची एकूण लांबी २५० किलोमीटर इतकी असणार आहे .

**राज्य मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय**

पुणे ते छत्रपती संभाजीनगर महामार्गाच्या सुधारित मार्गाचा प्रस्ताव बांधकाम विभागाने मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवला होता. त्या प्रस्तावाला मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे पुणे ते छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाच्या सुधारणेचा मार्ग मोकळा झाला आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. पुणे ते छत्रपती संभाजीनगर हा महामार्ग पूर्वी 'एनएचएआय'मार्फत करण्यात येणार होता. त्याला मान्यताही देण्यात आली होती. मात्र, एप्रिल दरम्यान हा महामार्ग 'एनएचएआय' आणि 'एमएसआयडीसी' यांच्यात झालेल्या करारानुसार 'एमएसआयडीसी'कडे हस्तांतर करण्यात आला. त्यामुळे त्या प्रकल्पावर 'एमएसआयडीसी' मार्फत काम करण्यात येत आहे.

## आधी टाळलं, पण अखेर भेटलेच! अमित शाह-अजित पवारांची विमानतळावर भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९मुंबई**

भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे मागील दोन दिवसांपासून महाराष्ट्र दौऱ्यावर होते. शाह यांच्या या दौऱ्याची राजकीय वर्तुळात सर्वाधिक चर्चा झाली ती राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अनुपस्थितीमुळे. अमित शाह यांचं विमानतळावर स्वागत करण्यापासून ते विविध गणपतींचं दर्शन घेण्यापर्यंत त्यांच्यासोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित होते. मात्र अजित पवार हे



मुंबईत असूनही शाह यांच्या भेटीसाठी न गेल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या होत्या. परंतु आता अमित शाह हे परतीच्या प्रवासाला निघण्यासाठी मुंबई विमानतळावर पोहोचल्यानंतर अजित पवार यांनी खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यासह त्यांची भेट घेतली आहे. यावेळी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस हेदेखील उपस्थित होते. मुंबई विमानतळावर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची अमित शाह यांच्यासोबत बैठक झाली. या बैठकीत आगामी विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी महायुतीची नेमकी काय रणनीती असली पाहिजे, तसंच जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित करण्याबाबत चर्चा झाल्याचे समजते. महायुतीतील तिन्ही पक्षांमध्ये एकजूट कायम राखण्यासाठी काय उपाययोजना केल्या पाहिजेत, यावरही आजच्या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती आहे.

## नाशिक येथे आदिवासी विद्यापीठ स्थापन करणार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची ग्वाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नाशिक**

राज्यपाल राधाकृष्णन यांनी आज सकाळी शासकीय विश्रामगृह येथे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री दादाजी भुसे, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, खासदार भास्कर भगरे, आमदार किशोर दराडे, आमदार मुफ्ती मोहम्मद इस्माईल, आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, आमदार नितीन पवार, आमदार राहुल ढिकले, आमदार हिरामण खोसकर आदी उपस्थित होते.



राज्यपाल म्हणाले की, आदिवासी बांधवांसाठी शासनाच्या विविध योजना आहेत. त्या माध्यमातून विकास कामे सुरू आहेत. या भागातील सामाजिक विकासासाठी विद्यापीठ स्थापन करण्यात येईल. या विद्यापीठात अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान आदी विषयांच्या सर्वोत्तम सुविधा असतील. नाशिक औद्योगिकदृष्ट्या विकसित होत असल्याने या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील. आदिवासी भागातील आरोग्य आणि शिक्षण व्यवस्था सक्षम करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील. वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरतीसाठी निर्देश देण्यात येतील. विद्यापिठातील प्राध्यापक भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे करण्याच्या सूचना देण्यात येतील, यासंदर्भात विद्यापीठांच्या कुलगुरूंशी चर्चा करण्यात आली आहे.

संपादकीय ......

# करू स्वच्छतेची आराधना..!

दहा वर्षांपूर्वी, म्हणजे २०१४ मध्ये भारतात केंद्रामध्ये सत्ताबदल होताच काही नवीन उपक्रम सुरू करण्यात आले. त्यामध्ये एक होता 'स्वच्छ भारत अभियान' हा. उघड्यावर शौच करणे थांबवण्यासाठी देशभर स्वच्छतागृहे बांधण्यात आली. तसेच सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ आणि कचरामुक्त ठेवण्याचा संदेश देण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तामिळनाडूतील महाबलिपुरमच्या समुद्रकिनार्यावर ते स्वतः कचरा वेचतानाचा एक व्हिडीओ टाकला. केवळ त्यांनीच नव्हे, तर अनेक केंद्रीय मंत्र्यांनी तसेच राज्याराज्यांतील मंत्र्यांनी स्वच्छता मोहीम हाती घेतली होती. त्यामुळे देशात याबाबतची हळूहळू जागरूकता वाढू लागली. स्वच्छता म्हटली की, जपानचे नाव आठवते. जपानला भेट देणार्या पर्यटकांना प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट म्हणजे तिथली स्वच्छता. जपानमधील सर्व शाळांमध्ये मुलांना साफसफाईचे प्रशिक्षण दिले जाते. तेथील मुले स्वतः वर्ग, जिने, व्हरांडे, प्रसाधनगृहे यांची स्वच्छता करतात. जपानमध्ये लहानपणापासून हे संस्कार झाले असल्यामुळे प्राथमिक ते उच्च माध्यमिक अशा शालेय वर्षांत स्वच्छता हा वेळापत्रकाचा अविभाज्य भाग असतो. जपानमध्ये सतत कचरा घेऊन जाणारे सफाई कामगार दिसत नाहीत. जागोजागी कचर्याचे डबे दिसत नाहीत. तरीही तेथे कमालीची स्वच्छता असते. याचे कारण प्रत्येक नागरिक स्वच्छतेची काळजी घेतो. याउलट भारतात येणारे पर्यटक येथील अस्वच्छता पाहून थक्क होतात!

अभिनेता आमिर खानला घेऊन केंद्र सरकारने स्वच्छतेचा संदेश देणारी एक प्रभावी जाहिरातही प्रसारित केली होती. केवळ ग्रामीण भागातच नाही, तर दिल्ली, मुंबईसारख्या शहरांत ओसंडून वाहणार्या कचराकुंड्या, तेथे असणारा डुकरांचा उच्छाद, उघडी गटारे आणि त्यांची दुर्गंधी, पानाच्या पिचकार्यांनी रंगलेल्या सरकारी कार्यालयांच्या भिंती हे चित्र सार्वत्रिक आहे. स्वच्छता अभियान सुरू होऊन अनेक वर्षे झाली, तरीही अजूनही बरेच काम बाकी आहे. या अभियानाची घोषणा झाली, तेव्हा अनेकांनी त्याची टिंगल केली होती. अर्थात, काही नेते हाती झाडू घेऊन फोटो काढून घेत होते, व्हिडीओ क्लिप्स बनवून त्या समाजमाध्यमांत टाकत होते आणि नंतर स्वच्छतेच्या या कार्याकडे ढुंकूनही पाहत नव्हते; पण तरीही या अभियानातून काही प्रमाणात अवती-भवतीची अस्वच्छता कमी झाली, गलिच्छपणा कमी झाला हे नाकारून चालणार नाही. आता 'नेचर' या नियतकालिकाने एक अभ्यास अहवाल प्रसिद्ध केला असून, २०१४ ते २०२० या कालावधीत स्वच्छ भारत अभियानामुळे दरवर्षी ६० ते ७० हजार अर्भकांचे मृत्यू टळले असावेत, असा निष्कर्ष काढला आहे. स्वच्छ भारत अभियानाचा २ ऑक्टोबर २०१४ रोजी प्रारंभ करण्यात आला. २०२० सालापर्यंत ११ कोटी कुटुंबांसाठी स्वच्छतागृहे बांधली. देशातील ६ लाख गावे खुल्या शौचापासून मुक्त करण्यात आली. शहरांमध्येही ६३ लाख घरांमध्ये शौचालये बांधली आणि ६ लाखांपेक्षा जास्त सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारली. हा अभ्यास अहवाल ज्यांनी तयार केला आहे, ते अर्थतज्ज्ञ आहेत. त्यांच्या अभ्यासानुसार, २००३ ते २०२० या काळात देशातील अर्भक मृत्यूचे प्रमाण घसरले, हे खरे; पण त्यातही २०१५ पासून होणारी घसरण ही विशेष असल्याचे त्यांच्या लक्षात आले. २००३ पर्यंत जिल्ह्यांमध्ये शौचालयांचे सरासरी प्रमाण ४० टक्केही नव्हते, ते २०२० पर्यंत ६० टक्क्यांपर्यंत पोहोचले. अर्थातच त्यामुळे रोगराईचे व संसर्गजन्य रोगांचे प्रमाण कमी झाले आणि त्यामुळे बालकांच्या आरोग्यात सुधारणा झाली. केरळमध्ये अर्भक मृत्युदर ५० टक्के कमी झाला, तर तामिळनाडू, कर्नाटक, दिल्ली, जम्मू-काश्मीर, आंध्र प्रदेश, बिहार, तेलंगणा यासारख्या राज्यांतही तो ३० ते ३८ टक्क्यांनी घटला. बिहारसारख्या मागास राज्यातही टॉयलेट क्रांतीमुळे किती परिवर्तन आले आहे.काही खेड्यांत आणि शहरांत घरात शौचालय असूनही बाहेर उघड्यावर नैसर्गिक विधी करणारे हजारो लोक आहेत. प्लास्टिक पिशव्या वापरण्यावर बंदी असूनही त्या वापरून कुठेही फेकल्या जातात. त्यामुळे गटारे तुंबतात. सुक्या व ओल्या कचर्याचे वर्गीकरण केले जात नाही. रस्त्यावर खाद्यपदार्थ विकणारे लोक भरपूर घाण करून ठेवतात. भाजी मंडयांमध्ये इतकी अस्वच्छता असते की, नाक मुठीत धरून चालावे लागते. मुंबईत दादरमध्ये प्लाझा मंडईत आणि त्याच्या लगत, बाहेर टिळक पुलावर भाजीपाला विक्रेते प्रचंड कचरा करून ठेवतात. असेच दृश्य अन्यत्रही आढळते. अशा गोष्टींमुळे श्वसनाचे व अन्य रोग वाढतात. याचा लोकांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होऊन, देशाची प्रतिमाही खराब होते. माणसाचे मन शुद्ध आणि निर्मळ असले पाहिजे, तसेच भवतालही स्वच्छ असला, तर वातावरणातील प्रसन्नता आणि सकारात्मकता वाढत असते. गणेशोत्सवानिमित्ताने परिसर स्वच्छ ठेवण्याची प्रतिज्ञा सर्वजण करूया.

## उद्याला गौरींचे आगमन..

# गौरीच्या आवाहनाचा शुभ मुहूर्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती-** जिल्ह्यात मंगळवार, १० सप्टेंबरला अनेक कुटुंबांकडे गौरीची (महालक्ष्मी) स्थापना केली जाणार असून, अनेकांनी विविध कुंभारवाड्यांमध्ये जाऊन गौरींचे सजलेले होण मुखवटे बघितले. यात महिला या मुखवटे तसेच दागिने निरखून बघण्यात दंग झाल्या होत्या. होत्या. शहरात सध्या विविध ठिकाणी मुखवट्यांसह महालक्ष्मीचे विविध साहित्य खरेदीसाठी भाविकांची गर्दी होत आहे.गौरीना पश्चिम महाराष्ट्रात गौरी-गणपती, तर मराठवाड्यात महालक्ष्मी असे म्हणतात. महालक्ष्मीचा हा सण तीन दिवस असतो व तो घरोघर साजरा केला जातो. पहिल्या दिवशी आगमन, दुस-या दिवशी गौरी भोजन व तिसर्या दिवशी म्हणजेच भाद्रपद शुक्ल अष्टमीला या गौरी -महालक्ष्मीचे विसर्जन करण्यात येते. तीन दिवस अगदी आनंदाचे, उत्सवाचे वातावरण असते.गौरी-गणपतीचा हा सण महाराष्ट्रात मोठ्या श्रद्धेने, पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. गौरी विसर्जन साधारणपणे तिस-या दिवशी वाजत गाजत व गौरीचा जयघोष करीत केले जाते. महाराष्ट्रात गौरी-गणपती या सणाचे आगळे असे सांस्कृतिक महत्त्व आहे.



**गौरीच्या आवाहनाचा शुभ मुहूर्तः** १० सप्टेंबर रोजी रात्री ८.०२ मिनिटांपर्यंत गौरीला घरी आणून आसनस्थ करावे.

ज्येष्ठा गौरी पूजन तिथी : २२ सप्टेंबर

-ज्येष्ठा गौरी पूजन मुहूर्त : दुपारी १२ च्या आधी गौरी पूजन करून गौरीला नैवेद्य दाखवावा.

ज्येष्ठा गौरी विसर्जन तिथी : २३ सप्टेंबर

- ज्येष्ठा गौरी विसर्जन मुहूर्त : दुपारी १. ३१ ते रात्री ९.५१ मिनिटांपर्यंत

# उधना ते पुरीदरम्यान धावणार साप्ताहिक उत्सव विशेष रेल्वे

## अमरावती, बडनेराच्या प्रवाशांसाठी लाभदायक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती** रेल्वेने आगामी सणासुदीच्या काळात प्रवास करणाऱ्याची मागणी लक्षात घेता तसेच प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन दिवाळी आणि छटपूजा या सणांमध्ये उत्सव विशेष ट्रेन चालवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार उधना ते पुरी साप्ताहिक उत्सव विशेष रेल्वेच्या २२ फेऱ्या होणार असून, अमरावतीकर व बडनेराच्या प्रवाशांना नागपूर, भुसावळ, गुजरात, जगन्नाथ पुरी येथे जाण्यासाठी अतिरिक्त पर्याय उपलब्ध झाला आहे. गाडी क्र. ०८४७२ उत्सव विशेष १७ सप्टेंबर ते २६ नोव्हेंबरपर्यंत प्रत्येक मंगळवारी सायंकाळी ५ वाजता उधना थून सुटेल



आणि दुसऱ्या दिवशी १०.४५ वाजता पुरी येथे पोहोचेल. त्याचप्रमाणें गाडी क्र. ०८४७१ ही १६ सप्टे. ते २५ नोव्हेंबरपर्यंत प्रत्येक सोमवारी सकाळी ६.३० वाजता पुरी येथून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दु.२ वाजता उधना येथे पोहोचेल.ही गाडी मार्गात चलठाण, व्यारा, नंदूरबार, अमळनेर, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, बडनेरा, वर्धा, नागपूर, गोंदिया, दुर्ग, रायपूर, बिलासपूर, झारसुगुडा संबलपूर सिटी, रायकाखोल, अंगुल, तालचेर रोड, घेनकनाल, भुवनेश्वर आणि खुर्दा रोड या स्थानकांवर थांबा घेईल. एक एसी २-टीयर, तीन एसी ३-टीयर, १० स्लीपर क्लास आणि चार जनरल सेकंड क्लास कोच, दोन गार्डस ब्रेक व्हॅनसह एकूण २० कोच अशी या उत्सव विशेष गाडीची रचना राहणार आहे.

# लिंबूवर्गीय फळपिकांवर बुरशी व किटकांचा प्रादुर्भाव, असे करा व्यवस्थापन

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक**

संत्रा / मोसंबी फळपिकांच्या आंबिया बहाराच्या फळांवर बुरशी व किटकांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. त्यामुळे फळगळ तसेच फळांच्या गुणवत्तेवर परिणाम दिसून येतो. त्या करिता रोग व किडींचे व्यवस्थापनेसाठी परिणाम कारक उपाययोजना करणे गरजेचे ठरते.

**फळमाशी :** १) प्रौढ मादी फळाच्या सालीखाली एक वा अनेक अंडी घालते.

२) तीन ते पाच दिवसांत अंडी उबून मळकट पांढऱ्या रंगाच्या लहान पाय नसलेल्या अळ्या बाहेर पडतात.

३) या अळ्या फळामध्ये शिरून त्यातील रस, गर खाऊन टाकतात. त्यामुळे फळाचा नाश होतो.

४) अंडी घालताना जिथे छिद्रे पडले असतात, तो भाग इतर रोगजंतुनी संक्रमित होऊन तिथे पिवळे डाग पडतात आणि अकाली फळगळ होते.

५) फळ दाबले असता फळातून छिद्रे असलेल्या जागेतून पिचकारी सारखे फवारे उडतात.

फळातील रस शोषण करणारा पतंग

१) या किडीमुळे सर्वाधिक फळगळ सप्टेंबर ते ऑक्टोबर महिन्यात दिसून येते.

२) या किडीचा पतंग सायंकाळी सक्रिय होऊन पक्व होत असलेल्या फळाला सुई सारख्या सोंडे द्वारे छिद्र करून रस शोषून घेतो.

३) छिद्र पडलेल्या जागेतून रोगजंतूचा शिरकाव होऊन फळ सडण्यास सुरुवात होते, परिणामी फळ गळून पडतात.

४) अशा फळांना दाबले असता छिद्रातून आंबलेल्या रस बाहेर येतो. गळलेले फळ पूर्णतः सडते, त्याला दुर्गंध येते व त्यावर अनेक छोट्या माश्या घोंगावू लागतात.

**कोलेटोट्रीकम स्टेम एंड रॉट किंवा देठ सुकणे**

१) कोलेटोट्रीकम बुरशीमुळे संत्रा फळाच्या देठाजवळ काळी रिग तयार होऊन तो भाग काळा पडतो. भाग नंतर वाढत जातो आणि संपर्ण फळ सडते.

२) कोवळ्या फांद्यावरील पाने सुकणे व ती वाळणे ही या रोगाची सुरुवातीची लक्षणे आहेत.

३) बरेचदा झालेल्या संसर्गामुळे रोगग्रस्त फळे संकुचित होतात, वजनाने हलके होऊन कडक होतात आणि दीर्घ काळापर्यंत देठांना लटकत राहतात.

**ग्रेसी स्पॉट-** १) सर्वप्रथम पानांवर पिवळसर ते गडद तपकिरी ते काळ्या रंगाचे चट्टे दिसून येतात.

२) पानाखाली असलेले चट्टे अधिक गडद होऊन संमातर वरीत पृष्ठभागावर सुद्धा विकसित होतात.

३) अनियमित आकाराचे पिवळे वलय असलेले तेलकट चट्टे पानाखाली व पानांच्या वरच्या बाजूने निर्माण होऊन दुरून झाडे पिवळी पडल्याचे भासते.

३) विकसित होत असलेल्या फळाना संसर्ग झाल्यास फळांच्या पृष्ठभागावर काळ्या रंगाचे, तहान आकाराचे डाग तयार होतात.

४) फळांवर, मृत पेशीयुक्त तेलकट चट्टे दिसून पडतात.

ब्राऊन रॉट (फळावरिल तपकिरी कूज)

१) फळाच्या हिरव्या कातडीस संक्रमण होऊन पूर्ण फळ हे तपकिरी काळ्या रंगा मध्ये परावर्तीत होते. फळे सडून गळतात.

२) या फळ सडीच्या अवस्थेस 'ब्राऊन रॉट' किंवां तपकिरी रॉट' असे संबोधतात.

३) फळे खाली पडल्यानंतर



फळांच्या पृष्ठभागावर पांढऱ्या बुरशीची वाढ दिसून येते.

४) करड्या रंगाची फळे यांची तोड केल्यानंतर ते निरोगी फळात मिसळल्यास निरोगी फळे पण सडतात.

**व्यवस्थापन :**

**फळमाशी** - १) फळमाशीच्या नरांना आकर्षित करण्याकरिता फळमाशी सापळे (मिथिल यूजोनौल) प्रती हेक्टरी २५ या प्रमाणात तोडणीच्या साधारण २ महिने आधीपासून बागेत झाडांवर टांगून ठेवावेत.

२) बागेतील खाली पडलेली फळे वेचून नष्ट करून बाग स्वछ ठेवावी.

३) फळमाशीची कोषावस्था जमिनीत २ ते ३ सेंटीमीटर खोलीपर्यंत असते.

४) झाडाखालील माती हलवून किंवा निंदून घ्यावी.

**फळातील रस शोषण करणारा पतंग**

१) संत्रा रस शोषक पतंग किडीसाठी संत्रा पिकाच्या व्यतिरिक्त असलेल्या यजमान तणाचा नाश करावा. उदा. गुळवेल, वासनवेल, चांदवेल इ. यजमान तणावर या किडीची अळी अवस्था राहते.

२) साधारणतः सायंकाळच्या वेळी (७ ते रात्री ११) या कालावधीमध्ये बागेच्या बांधावर गवत पेटवून धूर करावा.

३) फळ पक्वतेच्या वेळी बागेच्या चार हि कोपऱ्यामध्ये तसेच मध्यभागी एक मर्क्युरी प्रकाशाचे दिवे लावावेत आणि दिव्यांच्याखाली पसरट भांड्यामध्ये केरोसीन ओतून ठेवावे.

४) रसशोषण करणाऱ्या पतंगाकरिता विषारी आमिषे तयार करून बागेत ठेवावी. या करीता मॅलॅथिऑन ५० ईसी २० मिली २०० ग्रॅम गुळ खाली पडलेल्या फळांचा रस (४०० ते ५०० मिलि) २ लिटर पाण्यात मिसळून प्रत्येकी दोन आमिषे रुंद तोंडाच्या दोन बाटल्यात टाकून प्रत्येक २५ ते ३० झाडांमध्ये एक या प्रमाणात ठेवावे. ५) फळ हिरव्या रंगामधून पिवळसर रंगामध्ये रुपांतर होत असताना १०-१५ दिवसाच्या अंतराने फळ तोडणी होईपर्यंत निंबोळी तेल किंवा मिनरल ओईल १० मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

६) बागेतील खाली पडलेली फळे वेचून खड्यात पुरून बाग स्वछ ठेवावी.

कोलेटोट्रीकम स्टेम एंड रॉट किंवा देठ सुकणे

कोलेटोट्रीकम स्टेम एंड रॉटमुळे होणाऱ्या फळगळसाठी बोर्डेक्स ०.६ टक्के मिश्रणाची किवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी २.५ ग्रॅम प्रति लिटर किवा अझोक्सस्ट्रोबिन डायफेनकोणाझोल १ मिति प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी.

**ग्रेसी स्पॉट** - १) खाली पडलेल्या पानांचा खच यांचे विघटन जलद गतीने होण्याकरिता कडीकचरा विघटन करणाऱ्या ईतर उपयोगी बुरशींचा (शेणखता सह मिश्रित बायो- डिकंपोझर (१ किलो/ झाड) वापर करावा.

२) साधारणतः झायनेब' (२० ग्रॅम/१० लि. पाणी) किवा होर्टीकल्चरल मिनरल ऑइल २% (२०० मिलि १० लिटर पाणी) किवा पूर्व मिश्रित बुरशीनाशक हेक्साकोनाझोल ४% झापनेव ६८% डब्लुपी १५ ग्रॅम/१० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

३) मिनरल ऑइल किवा बुरशीनाशकांचा वापर केल्याने पानामध्ये बीजाणूंचा प्रवेश कमी होतो, तसेच बीजाणूंची उगवण कमी होते.

४) बुरशींचा संसर्ग झाला असल्यास लक्षणांच्या विकासास प्रतिबंध किंवा विलंब होतो. त्याचबरोबर तेलकट चट्टे यांची तीव्रता कमी दिसून येते.

ब्राऊन रॉट (फळावरील तपकिरी कूज)

१) सर्वप्रथम झाडांवर गळून पडलेल्या पानांची व फळांची विल्हेवाट लावावी. ती शेतात तशीच राहू देऊ नये. अन्यथा या रोगाची तीव्रता वाढण्यास मदत होऊन संक्रमण जलद गतीने होते.

२) वाफा स्वच्छ ठेवावा. फळबागेत फळाचे ढीग कुठेही ठेवू नका, कारण ते रोगाचे प्रसार करण्याचे कार्य करतात.

३) फायटोप्थोरा बुरशीमुळे होणाऱ्या पानगळ व फळावरील तपकिरी कुज वा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संपूर्ण झाडावर ४) फासिटील ए.एल. २.५ ग्रॅम किवा कॉपर ऑक्सीक्लोराईड ५० डब्लूपी ३ ग्रॅम प्रती लिटर पाणी घेऊन फवारणी करावी.

५) फवारणी करताना झाडाच्या परिघातामध्ये सुद्धा फवारणी करावी. जेणेकरून खाली पडलेली फळे उचललेली नसल्यास त्यावरील बुरशीचा नायनाट होईल.

६) तसेच जमिनीमधील सक्रीय बीजाणूचा नायनाट होण्यासाठी मदत होईल.

७) चांगले परिणाम मिळण्यासाठी या औषधामध्ये इतर कोणतेही तत्सम बुरशीनाशके, कीटकनाशके, विद्राव्य खते मिसळू नये.

८) फायटोप्थोरा बुरशीचा मुळांवर प्रादुर्भाव असल्यास सायमोक्सनील ८%, मकोजेब ६४%, डब्लूपी' (मिश्र घटक असलेले) बुरशीनाशक २५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून या मिश्रणात जवस तेल २.५ मिली मिसळून असे द्रावण वाफ्यात मिसळावे.

१०) किंवा मेटलवशील एम ३३% क्लोरोधायलोनीत ३३.१% एससी' (मिश्र घटक असलेते बुरशीनाशक २० मिली १० लिटर पाण्यात मिसळून द्रावण वाफ्यात टाकावे.

**अखिल भारतीय समन्वयीत संशोधन प्रकल्प (फळे), डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला**

**दि.९ विदर्भ प्रजासत्ताक**

मुलांच्या हातात मोबाईल देताय तर वेळीच सावध व्हा. मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांचे डोळे वाकडे होऊ शकतात. इतकंच नव्हे तर दृष्टीही जाऊ शकते. मुलं रडायला लागली की आपण मुलांच्या हातात मोबाईल देतो. मात्र, मुलांना मोबाईल देणं महागात पडेल. एका रिसर्चमध्ये धक्कादायक माहिती समोर आलीय.




## मोबाईल मुलांच्या हातात देताय, सावधान! मोबाईलच्या वापरामुळे डोळे होतात वाकडे?

**मोबाईलमुळे मुलांचे डोळे वाकडे**

२००१ साली मुलांना कमी दिसण्याची समस्या ७ टक्के होती

२०११ साली मुलांना कमी दिसण्याची समस्या १३.५ टक्क्यांवर गेली

२०२१ मध्ये २० ते २२ टक्के एवढी वाढली.



गेल्या २० वर्षात मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे कमी दिसण्याची समस्या तीन पट वाढलीय...स्क्रीन टाईम म्हणजेच मोबाईलचा पाहण्याचा वेळ वाढत असल्यामुळे दृष्टी कमी होतेय. रात्री अंधारात मोबाईल पाहिल्यामुळे डोळे सुकतात आणि थेट नजरेवर परिणाम होता. अनेक मुलांना चष्मा लागलाय. ३ हजार शाळांमध्ये ही स्टडी केल्यानंतर मुलांची नजर कमी होत असल्याचं निष्पन्न झालंय.

मुलांची नजर का कमी होतेय.? आणि मोबाईलमुळे मुलांचे डोळे का वाकडे होतायत...? हे सविस्तर पाहुयात.

मोबाईलमुळे मुलांचे डोळे वाकडे

ध्या मोबाईलचा वापर लहान मुलांमध्ये जास्त वाढलाय.

मुलांच्या डोळ्यांची वाढ होत असल्यामुळे मोबाईलमुळे गंभीर परिणाम होतात.

मोबाईलचा खूप वापर केल्यामुळे डोळ्यांवर परिणाम होऊ शकतो.

मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांचे डोळे वाकडे होतात.

सतत मोबाईल पाहिल्यामुळे डोळ्यांना स्ट्रोकही येऊ शकतो.

मोबाईलचा वापर जेवढा चांगला तेवढाच वाईट आहे...त्यामुळे मुलांना जास्त मोबाईलची सवय लावू नका. त्यांना मैदानी खेळ शिकवा, त्यांना वेळ द्या...नाहीतर मोबाईलचा अतिवापर मुलांचं आयुष्य उद्धवस्त करू शकतो.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ९ सप्टेंबर २०२४

शहर/ग्रामिण


# कंत्राटी शिक्षक नियुक्तीचा निर्णय वादात

## राज्य प्राथमिक शिक्षक समितीकडून आंदोलनाचा इशारा

### शिक्षण विभागाने निर्णय रद्द करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

राज्यातील २० किंवा त्यापेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये निवृत्त शिक्षक किंवा डीएड, बीएड पात्रताधारकांची दरमहा १५ हजार वेतनावर कंत्राटी नियुक्ती करण्याचा निर्णय वादात सापडला आहे.राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. पवित्रप्रणालीमार्फत भरतीप्रक्रियेतून नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी निवृत्त शिक्षकांच्या नियुक्तीचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला होता. त्यानंतर शिक्षण विभागाने शिक्षक दिनीच कंत्राटी शिक्षक नियुक्तीचा निर्णय जाहीर केला. त्यानुसार कमी पटसंख्येच्या सर्वच शाळांमध्ये निवृत्त शिक्षक उपलब्ध होतील असे नाही. त्यामुळे पद रिक्त राहून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. राज्यात डीएड, बीएड झालेले पात्रताधारक बेरोजगार उमेदवार मोठ्या प्रमाणात आहेत.त्यांना कमी पटसंख्येच्या शाळांवर संधी दिल्यास शिक्षकांची पदे रिक्त न राहता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, असे शिक्षण विभागाच्या निर्णयाद्वारे स्पष्ट करण्यात आले.राज्यभरातील तरुणांनी शिक्षक होण्यासाठी वर्षानुवर्षे अभ्यास करून पात्रता मिळवली आहे. राज्यात शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असताना कंत्राटी नियुक्ती करण्याचा शिक्षण विभागाचा निर्णय अत्यंत चुकीचा आहे. नियमित नियुक्ती होणाऱ्या उमेदवारांना १६ हजार रुपये वेतन मिळते आणि कंत्राटी शिक्षकांना १५हजार रुपये वेतनाचे आमिष दाखवण्यात आले आहे. कंत्राटी शिक्षकांनी इतक्या कमी वेतनात नियमित शिक्षकाप्रमाणे सर्व कामे करणे ही पिळवणूक आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने कंत्राटी शिक्षक नियुक्तीचा निर्णय तातडीने मागे घेण्याची मागणी पात्रताधारकांनी केली. तसेच या निर्णयाविरोधात आंदोलन करण्यात येणार असल्याचेही सांगितले.आप पालक युनियनचे मुकुंद किर्दत म्हणाले, की कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये कंत्राटी शिक्षक आणि सेवानिवृत्त शिक्षक नियुक्तीचा निर्णय लाखो पात्रताधारकांसाठी अत्यंत उद्वेगजनक आहे. केवळ १५ हजार वेतनावर काम करायला लावून उमेदवारांचे आर्थिक शोषण केले जाईल. त्यामुळे महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रासाठी हे अत्यंत धोकादायक धोरण आहे.

■ कमी पटसंख्येच्या नावाखाली नियमित शिक्षकालाच हद्दपार करायचे अशा प्रकारचा निर्णय शासनाने शिक्षक दिनीच घेतला. हा निर्णय शिक्षकांच्या अस्मितेलाच धक्का देणारा, कमीपटसंख्येच्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या गुणवतेसाठी मारक आहे. या निर्णयाच्या विरोधात राज्यात आंदोलन करण्यात येणार आहे.



**विजय कोंबे,** राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती

# अखेर गुलाबपुरीच्या गणपतीची प्रतिष्ठापना, वादग्रस्त देखाव्याची चर्चा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नागपूर** –वादग्रस्त देखाव्यांची परंपरा असलेल्या नागपुरातील प्रसिद्ध गुलाब पुरीच्या गणपतीची अखेर रविवारी सांयकाळी प्रतिष्ठापना करण्यात आली. यावर्षी देखाव्यातून सरकारवर टीका करण्यात आली आहे. एकीकडे लाडकी बहीण योजनेव्दारे महिलांचा सन्मान तर दुसरीकडे बदलापूर प्रकरणावर मौन असे चित्र साकारण्यत आले आहे. बदलापूर मुद्यावर राजकारण नको, असे सूचित करण्यात आले आहे. हा देखावा पाहण्यासाठी लोकांनी गर्दी केली आहे.

मध्य नागपुरातील पाचपावली परिसरात नागपुरातील हा गुलाब पुरीचा गणपती प्रसिद्ध आहे. गमपती प्रतिष्ठापनेच्या निमित्ताने दरवर्षी देशातील राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांवर देखावे तयार केले जातात. अनेकदा वादग्रस्त विषयांवर हे देखावे असल्याने ते पोलिसांकडून जप्त केले जातात. त्यामुळे नेहमी हा गणपती चर्चेत राहतो.शनिवारी सर्वत्र गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आल्यानंतर दुसऱ्या दिवशी गुलाब पुरी यांचा मुलगा चंद्रशेखर पुरी यांनी रविवारी सायंकाळी गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली व देखावा लावण्यात आला. बदलापूर प्रकरणावर राजकारण नको, असा संदेश देणारा फलक लावण्यात आला आहे. देशात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराकड़े लक्ष वेधण्यात आले. यावर काही तरी करा असा असा संदेश देत पंतप्रधान बदलापूर प्रकरणावर चुप का आहे? असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. या देखावा वादग्रस्त ठरू शकतो. मंडपापुढे पोलिसांचा मोठ्या प्रमाणात बंदोबस्त लाण्यात आला आहे.

# गणपती बाप्पा मोरया.......



**विदर्भ प्रजासत्ताक,**
**दि.९अमरावती** पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथे संस्थाध्यक्ष प्रविण पोटे पाटील तसेच सचिव श्रेयशदादा पोटे पाटील यांनी श्रींची विधिवत पूजा करत स्थापना केली. दहा दिवस अतिशय उत्साहात या ठिकाणी बाप्पांची आराधना साजरी करण्यात येते.यावेळी महाविद्यालयाचे संचालक, प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# सोयाबीन शेतकऱ्यांसाठी गुडन्यूज : ९० दिवसांसाठी हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई :–** कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्र सरकारकडे मागील काही दिवसांपासून केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून केंद्र सरकारने महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांमध्ये ९० दिवसांसाठी किमान हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे.

केंद्रीय कृषी मंत्रालयाने धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार समर्थन मूल्य योजनेच्या अंतर्गत सोयाबीन व उडीद ही दोन पिके ९० दिवसांसाठी हमीभावाने खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे.

केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान हे राज्य कृषि महोत्सवाच्या निमित्ताने परळीत आले तेव्हा धनंजय मुंडे यांनी याबाबत मागणी केली होती, तसेच दिल्ली येथे भेटूनही याबाबत पाठपुरावा केला होता.

केंद्र सरकारने महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांमध्ये सोयाबीनची किमान आधारभूत किंमत ही ४ हजार ८९२ रुपये



प्रति क्विंटल इतकी निश्चित केली असून, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांसह वेळोवेळी पाठपुरावा व समर्थन देणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार व्यक्त केले आहेत.

राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मदत व्हावी व त्यांचे बाजारभाव पडल्याने नुकसान होऊ नये या दृष्टीने हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात यावी, त्याचबरोबर सोया मिल्क, खाद्यतेल, सोया केक इत्यादी उत्पादने आयात करण्यावर शुल्क लावावे तसेच सोयाबीन निर्यातीसाठी प्रतिक्विंटल किमान ५० डॉलर अनुदान द्यावे.याबाबत मी केंद्र सरकारकडे सातत्याने पत्र व्यवहार व पाठपुरावा केला तसेच यासंदर्भात केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याशीदेखील वारंवार संपर्कात होतो. केंद्र सरकारने ९० दिवसांकरिता हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करण्यास मान्यता दिल्याने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अधिकचा आर्थिक लाभ मिळणार असल्याचा मला मनापासून आनंद होतो आहे, अशा भावना कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केल्या आहेत.

# अमरावतीत कापूस खरेदीचा श्रीगणेशा, ७७७७ रुपये प्रति क्विंटल भाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती** – सागरराज कॉटन इंडस्ट्रीजच्या वतीने आज कापूस खरेदीचा श्रीगणेशा करण्यात आला. अडते नवलकिशोर मालपाणी तसेच कृष्णा मालपाणी यांच्या यांच्या माध्यमातून शेतकरी मो. जमील शेख नजीर यांचा कापूस खरेदी करण्याचा शुभारंभ करून कापसाला ७७७७ रुपये प्रति क्विंटल एवढा भाव देण्यात आला. विदर्भ आणि खान्देश मध्ये गेल्या १९ वर्षांपासून कापूस खरेदीचा शुभारंभ अमरावतीमधून होतो आणि येथूनच ठरलेले दर नंतर कायम करण्यात येतात. रविवारी सागरराज कॉटन इंडस्ट्रीजचे संचालक राजकुमार पमनानी, व्यवस्थापकिय संचालक अनिल पमनानी, सागर पमनानी यांच्या हस्ते आज प्रथम कापूस खरेदी करून विधिवत पूजन करण्यात आले. शेतकऱ्यांना अधिकाधिक दर मिळावे असा सागरराज इंडस्ट्रीजचा नेहमी प्रयत्न असतो.

विदर्भ आणि खान्देश मध्ये गेल्या १९ वर्षांपासून अमरावतीत कापूस खरेदीचा शुभारंभ होत असून येथूनच ठरलेले दर विदर्भ आणि खान्देश मधील शेतकऱ्यांना दिल्या जातात.आज खरेदी



करण्यात आलेल्या कापसाला ७७७७ रुपये प्रति क्विंटल दर निश्चित करण्यात आले असून सागरराज इंडस्ट्रीज चे राजकुमार पमनानी,व्यवस्थापकिय संचालक अनिल पमनानी, सागर पमनानी यांच्या हस्ते शेतकरी मो. जमील शेख नजीर यांचा नारळ दुपट्टा देऊन सत्कार देखील करण्यात आला. अडते नवलकिशोर मालपाणी, कृष्णा मालपाणी यांच्या माध्यमातून विदर्भ तथा खान्देश मधील शेतकरी बांधव आपला कापूस अमरावतीच्या बाजारात आणतो. त्यामुळे आज निर्धारित झालेल्या दरामुळे शेतकरी वर्गाला दिलासा मिळाला असून प्रथम कापूस खरेदी शुभारंभ प्रसंगी सागरराज इंडस्ट्रीज व मालपाणी यांना उपस्थित शेतकऱ्यांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी खरीददार,अडते तथा असंख्य शेतकरी बांधव उपस्थित होते.

# गणेश चतुर्थीला मिरवणुकीवर दगडफेक

## मध्य प्रदेशातील रतलाममध्ये तणाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ रतलाम म.प्र.–** मध्य प्रदेशातील रतलाममध्ये गणेश चतुर्थीच्या मिरवणुकीवर काही अज्ञातांनी दगडफेक केल्याची घटना घडली आहे. या दगडफेकीत काही लोक जखमी झाले आहेत. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल असून शहरातील अनेक महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. रतलामध्ये सध्या तणावपूर्ण शांतता आहे.इंडियन एक्सप्रेसने पोलिसांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, शनिवारी रात्री हा प्रकार घडला. शहरातील मोचीपुरा भागातून गणपतीची मिरवणूक जात असताना अज्ञातांनी अचानक दगडफेक सुरू केली. या घटनेनंतर आरोपींना पकडण्याची मागणी करण्यासाठी नागरिकांनी पोलीस ठाण्याला घेराव घातला. महत्त्वाचे म्हणजे



पोलीस घटनास्थळी दाखल होताच त्यांच्या वाहनांवरही दगडफेक करण्यात आली. यात पोलिसांच्या गाडीच्या काचाही फुटल्या.यासंदर्भात बोलताना पोलीस अधिक्षक म्हणाले, रतलामध्ये सध्या परिस्थिती नियंत्रणात असून येथे तणावपूर्ण शांतता आहे. या दगडफेकीच्या घटनेत काही लोक जखमी झाले आहेत. त्यांना उपाचाराकरिता रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या दगडफेकीमुळे गणपतीच्या मुर्तीचं कोणतेही नुकसान झालेलं नाही.

# विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवाराला साथ देणार नाही

## अचलपुरातील शिवसेना (उबाठा) पदाधिकाऱ्यांच्या भूमिकेने खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती/ अचलपूर** महाविकास आघाडीचे कार्यक्रम अथवा आंदोलन करताना काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेत नाही, असा आरोप करीत येत्या निवडणुकीत काँग्रेस उमेदवाराला साथ देणार नाही, अशी भूमिका शिवसेना (उबाठा) पदाधिकाऱ्यांनी घेतली. पत्रपरिषद घेऊन त्यांनी काँग्रेस पदाधिकाऱ्यांवर आपली नाराजी व्यक्त केली आहे.शिवसेनेच्या या भूमिकेने मात्र राजकीय गोटात खळबळ उडाली आहे.

अचलपूर मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार तथा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू देशमुख यांना साथ देणार नाही, अशी भूमिका घेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आपली बाजू पत्रकार परिषदेमध्ये मांडली. या पत्रकार परिषदेमध्ये शिवसेना नेते ओमप्रकाश दीक्षित, शिवसेना तालुकाप्रमुख उत्तमराव होम, नरेंद्र फिसके, नरेश भाकरे, विलास सोळंके, सागर वाटणे, पंकज पाटील प्रामुख्याने उपस्थित होते.या पत्रकार परिषदमध्ये त्यांनी



सांगितले की, लोकसभेचे उमेदवार बळवंत वानखडे यांना शिवसेनेमुळे यश आले. परंतु त्यानंतर काँग्रेसने शिवसेना (उबाठा) पदाधिकाऱ्यांना कधीही विश्वासात घेतले नाही. नुकतेच झालेले जोडे मारो आंदोलन हे सुद्धा काँग्रेसच्या नावावर घेण्यात आले. काँग्रेसचे उमेदवार कोणत्याही कार्यक्रमांमध्ये शिवसेनेच्या नेत्यांना बोलावित नाही. त्यामुळे अचलपूर मतदारसंघात शिवसेना स्वतंत्र उमेदवार देणार या प्रकारची भूमिका पत्रकार परिषदेमध्ये घेण्यात आली.

# रिध्दपूर येथे मराठीचे पहिले विद्यापीठ देता आले याचा आनंद- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## भगवान सर्वज्ञ श्री. चक्रधर स्वामी अवतरण दिन वर्षानिमित्त कविवर्य सुरेश भट सभागृहात संमेलन उत्साहात साजरे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९नागपूर–** भगवान सर्वज्ञ श्री. चक्रधर स्वामी यांची जन्मभूमी ही गुजरातमध्ये तर कर्मभूमी महाराष्ट्र होती. येथूनच त्यांनी संपूर्ण भारतासह अफगाणिस्थानपर्यंत आपल्या महानुभाव पंथाचा, धर्माचा प्रसार व प्रचार केला. धर्मावरच्या चर्चा सर्वसामान्यांपर्यंत पोहचाव्यात, त्यांना धर्माचे आकलन व्हावे यासाठी त्यांनी आपल्या बोलीभाषेचा अर्थात मराठीचा आग्रह धरला. खऱ्या अर्थाने मराठीची सेवा भगवान सर्वज्ञ श्री. चक्रधर स्वामींनी केली. मी मुख्यमंत्री असतांना रिध्दपूर येथे मराठी विद्यापीठासंदर्भात निर्णयाची संधी मिळाली होती. सत्ता बदलामुळे मध्यंतरीचा कालखंड हा या विद्यापीठासाठी अनुकूल नव्हता. आम्ही पुन्हा सत्तेवर येताच स्वामींनी दिलेली ही संधी आहे असे मानून आपण मंत्री मंडळाच्या बैठकीत हा निर्णय जाहीर करुन कुलगूरुंची नियुक्ती केल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतरण दिन वर्ष निमित्त येथील सुरेश भट सभागृहात आयोजित संमेलनात ते बोलत होते. या वेळी विध्वंस बाबा, परम पुज्यनीय कारंजेकर बाबा, कापूसतळणीकर बाबा, बिडकर बाबा, मु.धो.व्यास बाबा, आमदार परिणय फुके, कृपाल तुमाने, इतर संत–महंत आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

या संमेलनानिमित्त उपस्थित अनेक मान्यवर महंत एका मंचावर येत असल्याने त्यांचे आशिर्वाद घेण्याची मला संधी मिळाली या शब्दात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी



आपल्या भाषणाच्या सुरुवातीला कृतज्ञता व्यक्त केली. ज्या–ज्या भागात मराठी बोलल्या जाते तो प्रदेश म्हणजे महाराष्ट्र अशा सोप्या भाषेत श्री चक्रधर स्वामी यांनी महाराष्ट्राची व्याख्या केली. मराठी भाषेच्या अनुषंगाने रिध्दपूरला एक विशेष महत्व आहे. मराठीतील पहिला ग्रंथ रिध्दपूरला साकारला व तो महानुभाव पंथाने निर्माण केला अशी धारणा आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा हा आग्रह धरतांना आपल्याकडे मराठीतील हे ग्रंथच महत्वाचे प्रमाण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.जवळपास २३० कोटी रुपयांचा विकास आराखडा रिध्दपूरसाठी मी मुख्यमंत्री असतांना तयार केला होता. आपल्या आग्रहामुळे हे काम आजवर पुढे वाढवू शकलो असे त्यांनी स्पष्ट केले. वास्तविक पाहता त्याच वेळेस आपण एक समिती तयार केली होती असा उल्लेख करुन भगवान चक्रधर स्वामींचा पुन्हा आशिर्वाद मिळाल्याने सत्तेत आलो. यामुळेच समितीचा अहवाल पुन्हा समोर घेऊन अर्थमंत्री नात्याने अगोदर आर्थिक तरतूद केल्याचे त्यांनी सांगितले.

आज मराठीचे पहिले विद्यापीठ हे रिध्दपूरला स्थापन झाले असून त्याच्या कुलगूरुपदी महानुभाव पंथाच्या अभ्यासकाला नियुक्ती करता आल्याचा आनंद वेगळा असल्याचे ते म्हणाले. अर्थसंकल्पात सांगितल्याप्रमाणे दुसऱ्या टप्यातील २५ कोटीचा निधी देण्याचा निर्णय केला आहे. श्री क्षेत्र पांचाळेश्वर येथे निधी देण्याचा निर्णय आपण घेतला आहे. याचबरोबर इतर देवस्थानांना निधीची उपलब्धता आपण केली आहे. जवळपास ७८ कोटी रुपयांचा हा निधी आहे. काटोल येथे कामाबाबत जो प्रस्ताव आलेला आहे. त्याबाबत २५ कोटीचा आराखडा आपण तयार करुन टप्याटप्याने निधी उपलब्ध करुन देऊ असे उपमुख्यमत्री फडणवीस यांनी सांगितले.अनेक परकीय आक्रमणांच्या काळात महानुभाव पंथाने आपला धर्म टिकवून ठेवला. कुठलाही जातीपातीचा विचार न करता सर्वसमाज एक आहे अशा प्रकारचा एकात्म भाव महानुभाव पंथाने दिला आहे. यामुळे कोणताही भेदभाव इथे नाही. हा एकसंघपणा, एकात्म भाव राष्ट्रासाठी महत्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. याचबरोबर व्यसनमुक्त समाज निर्माण करण्यामध्ये महानुभाव पंथाचा महत्वपूर्ण वाटा असल्याचे गौरोद्गारही त्यांनी काढले.

महानुभाव पंथ व माझा गत २८ वर्षांपासून स्नेहभाव आहे. मी महापौर असताना चिचभवन येथील संमेलनात सेवेची संधी मिळाली होती. चिचभवन परिसरात महानुभाव पंथाच्या भवनाला जागा उपलब्ध करुन देण्याच्या मागणीचा प्राधान्याने विचार करून निर्णय घेण्याचे सुतोवाच त्यांनी केले.

महानुभाव ग्रंथाचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. आमदार परिणय फुके, आमदार कृपाल तुमाने यांच्यासह महंताचे समयोचित भाषणे झाली. रिध्दपूर येथील मराठी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ अविनाश अवलगावकर व इतर महंतांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

---

# धक्कादायक... विदर्भात आठ महिन्यांत ७०० शेतकऱ्यांचे बळी

## दर आठ तासात एक शेतकरी कवटाळतो मृत्यूला


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती :** राज्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या पश्चिम विदर्भात होत आहेत. विदर्भात यंदा आठ महिन्यांत ६९८ शेतकऱ्यांनी मृत्यूचा फास आवळला आहे. दर आठ तासात एक शेतकरी अस्मानी अन् सुलतानी संकटाचा बळी ठरत असल्याचे दाहक वास्तव आहे.

नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, नापिकी, बँकांचे व सावकारांचे कर्ज, कर्जासाठी तगादा, मुलींचे लग्न, आजारपण यासह अन्य कारणांमुळे शेतकरी आत्महत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. यामध्ये मराठवाड्यातील शेतकरी सावरला; पण पश्चिम विदर्भातील शेतकरी संघर्षावर

### दरदिवशी तीन शेतकऱ्यांची आत्महत्या

१) यंदा आठ महिन्यांत ६९८ शेतकरी आत्महत्या झाल्या आहेत. यामध्ये यवतमाळ जिल्ह्यात सर्वाधिक २०४, अमरावती १८०, बुलढाणा १५५, अकोला १०६ व वाशिम जिल्ह्यात ५३ प्रकरणे आहेत. यापैकी २१८ प्रकरणे पात्र, २१५ अपात्र, २६५ चौकशीसाठी प्रलंबित आहेत. फक्त ६५ प्रकरणांत शासन मदत देण्यात आलेली आहे. विभागात दर तीन तासात एक शेतकरी आत्महत्या होत आहे.



मात करीत आहेत. यासाठी शासन–प्रशासनाचे प्रयत्न थिटे असल्याने दरदिवशी तीन शेतकरी अस्मानी–सुलतानी संकटाचे बळी ठरत आहेत.शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यात सन २००१ पासून शेतकरी आत्महत्यांची नोंद ठेवली जात आहे. त्यानुसार अमरावती विभागात आतापर्यंत २० हजार ७७२ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत. यापैकी १० हजार ७६३ प्रकरणे विविध कारणांनी अपात्र, तर ९ हजार ७३५ प्रकरणे पात्र ठरली आहेत. ९ हजार ५३७ प्रकरणांत शासन मदत देण्यात आलेली आहे. अद्याप २७४ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. शासन, प्रशासन शेतकरी आत्महत्यांविषयी गंभीर नसल्याने कोणत्याही ठोस उपाययोजना यामध्ये झाल्या नसल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे.

---

# आमदार रवी राणा लालबागच्या राजा चरणी नतमस्तक



मुबंई येथे लालबागच्या राजाचे दर्शन घेऊन पंतप्रधाननरेंद्र जी मोदी यांच्या नेतृत्वात राज्यात पुन्हा महायुती चे सरकार यावे व शेतकरी, शेतमजूर,व्यापारी, उद्योजक,गृहिणी, विद्यार्थी यांच्या जीवनात सुख समृद्धी शांती नांदावी व सर्वांचे मंगलमय कल्याण व्हावे अशी प्रार्थना केली,जनसेवेसाठी व जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळण्यासाठी नवनीत रवी राणा यांना केंद्रात स्थान मिळो अशी प्रार्थना सुध्दा आमदार रवी राणा यांनी यावेळी केली.

---

# अमरावती जिल्ह्यातील तीन मतदार संघांमध्ये प्रचंड स्पर्धा, बंडखोरी अटळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती :** विधानसभेची निवडणूक दिवाळीनंतर होण्याचे संकेत मिळाले असताना राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. उमेदवारीसाठी दोन्ही बाजूंनी दबावतंत्राचा वापर केला जात आहे. महायुती आणि महाविकास आघाडीत जागावाटपावरून रस्सीखेचही सुरू झाली आहे. पक्षांतर्गत चढाओढीसोबतच महायुतीच्या घटक पक्षांनी आपल्या जागा मागणीच्या तलवारी उपसल्या आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीत बंडखोरीची लागण होणार हे निश्चित मानले जात आहे.

अमरावती जिल्ह्यात विधानसभेच्या ८ जागा आहेत. गेल्या निवडणुकीत तीन जागा काँग्रेसला दोन जागा प्रहार जनशक्ती पक्षाला, एक जागा भाजपला, एक जागा अपक्ष आणि एक जागा स्वाभिमानी पक्षाला मिळाली होती. राज्यात सत्तांतरानंतर बदलेल्या परिस्थितीत आता दोन जागा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडे आहेत. दोन जागा काँग्रेसकडे, दोन जागा प्रहार जनशक्ती पक्ष आणि प्रत्येकी एक जागा ही भाजप तसेच युवा स्वाभिमान पक्षाकडे आहे.

बडनेराचे आमदार रवी राणा यांचा युवा स्वाभिमान पक्ष हा महायुतीचा घटक पक्ष आहे. त्यांच्या पत्नी माजी खासदार नवनीत राणा या भाजपमध्ये आहेत. मात्र रवी राणांनी आपण भाजपमध्ये प्रवेश करणार नसून युवा स्वाभिमान पक्षातर्फे निवडणूक लढणार असल्याची घोषणा केली आहे. बडनेरातून आता बाहेरचा लादलेला उमेदवार नको, अशी मागणी करून भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी राणांच्या विरोधात भूमिका घेतली आहे. लोकसभा निवडणुकीत बडनेरा मतदार संघात नवनीत राणांना आघाडी मिळाली, ही भाजपमुळे मिळाली, त्यामुळे आता बडनेरातून कमळ चिन्हावर निवडणूक लढल्याय हमखास यश मिळेल, असा दावा भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी केला



आहे. भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य आणि माजी नगरसेवक तुषार भारतीय, भाजपचे प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी, प्रदेश सचिव जयंत डेहणकर यांच्यासह अनेक नेते उमेदवारीसाठी इच्छूक आहेत. या ठिकाणाहून महायुतीत बंडखोरी अटळ मानली जात आहे.

मोर्शी मतदार संघात महायुती आणि महाविकास आघाडीतही उमेदवारीवरून संघर्ष होण्याची शक्यता आहे. आमदार देवेंद्र भुयार यांची स्वाभिमानी पक्षातून हकालपट्टी झाल्यानंतर त्यांनी अजित पवार यांची साथ देण्याचा निर्णय घेतला. महायुतीत मोर्शी मतदारसंघ राष्ट्रवादी अजित पवार गटाला मिळावा, यासाठी खुद्द अजित पवार आग्रही आहेत. त्यामुळे भाजपमध्ये अस्वस्थता आहे. भाजपमधून खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या पत्नी डॉ. वसुधा बोंडे, डॉ. अविनाश चौधरी, अर्चना मुरूमकर, नीलेश ठाकरे, मनोहर आंडे हे इच्छूक आहेत. महाविकास आघाडीतही स्पर्धा आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून माजी मंत्री आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख आणि काँग्रेसतर्फे विक्रम ठाकरे हे इच्छूक आहेत.

अचलपूरचे प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार बच्चू कडू हे महायुतीत असले, तरी त्यांचा वेगळा सूर महायुतीसाठी अडचणीचा बनला आहे. भाजपने या मतदार संघातून तयारी केली आहे. भाजपमधून नंदू वासनकर, प्रवीण तायडे, गोपाळ तिरमारे ,सुधीर रसे हे स्पर्धेत आहेत. काँग्रेसमधून जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्यासह काही नेते इच्छूक आहेत. या ठिकाणीही बंडखोरी होण्याची चिन्हे आहेत.

---


# महाराष्ट्रातील वाघांचे 'डिमोशन'; राज्य शासनाचे दुर्लक्ष

## भारतीय वनसेवेतील लॉबीचा प्रताप : वन्यजीव विभागाचे पंख छाटले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–** राज्य शासनाच्या नाकावर टिचून महाराष्ट्रातील भारतीय वनसेवा (आयएफएस) लॉबीने वन्यजीव विभागाचे पंख छाटल्याचे दिसून येते. अत्यंत संवेदनशील असणाऱ्या या वन्यजीव विभागाचे नव्हे तर एक प्रकारे वाघांचे 'डिमोशन' केल्याच्या भावना आता व्यक्त होत आहेत.

महाराष्ट्रात वाघांची संख्या झपाट्याने वाढत आहे. विदर्भात तर दरदिवशी वाघ आणि मानव संघर्षाच्या घटना



घडतच आहेत. त्यामुळे वन्यजीव विभागाला सशक्त करण्यासाठी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार हे प्रयत्नरत असले तरी त्यांच्या विभागातील 'सरदार' मात्र आत्मीयता ठेवत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यात वन्यजीव विभागात 'पनीशमेंट पोस्टिंग' समजली जाते. आजही 'टॉप टू बॉटम' अनेक पदे रिक्त आहे. परंतु आयएफएस लॉबी सोयीनुसार पदांची व्यवस्था करीत आहे.

### वनमंत्र्यांना ठेवले अंधारात

वन्यजीवचे पीसीसीएफ महिप गुप्ता हे सेवानिवृत्त झाल्यापासून ते पद रिक्त आहे. मात्र, या पदाचे डिमोशन करून विवेक खांडेकर या दुय्यम दर्जाच्या अधिकाऱ्याकडे 'टायगर'ची कमान सोपविली आहे. वास्तविकत: सामाजिक वनीकरणाचे पीसीसीएफ हे पद दुय्यम दर्जाचे करणे गरजेचे होते. मात्र, तसे झाले नाही. याविषयी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना अंधारात ठेवून हा प्रताप केला आहे. तर वनमंत्र्यांच्या जिल्ह्यातच सर्वाधिक वाघांची दहशत पसरलेली आहे.

### आता वन्यजीवमध्ये पीसीसीएफ नसणार

महसूल व वनविभागाने ५ सप्टेंबर २०२४ रोजी ३० आयएफएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांची यादी जारी केली आहे. यात वन्यजीव विभागाचे प्रधान मुख्य वनसंरक्षक या सर्वोच्च पदाचे डिमोशन केले आहे. हा प्रकार म्हणजे वाघांचे डिमोशन मानले जात आहे. वन्यजीव विभागात आता पीसीसीएफ हे पद यापुढे नसणार आहे. विवेक खांडेकर यांना अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक म्हणून नियम १९६६च्या ४(२)चा आधार घेत पोस्टिंग दिली आहे. त्यामुळे वन्यजीव विभागाचे प्रधान मुख्य वनसंरक्षक हे पद अस्थगित ठेवण्याची किमया आयएफएस लॉबीने केली आहे.

---

# दर्यापूर येथील उपविभागाला जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिली भेट

## संत्रा पिकाच्या नुकसानीची केली पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती–** जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दर्यापूर, अंजनगाव तालुक्याला नुकतीच भेट दिली. यावेळी दर्यापूर उपविभागीय अधिकारी राजेश्वर हांडे, नायब तहसिलदार, गटविकास अधिकारी, नगर परिषद मुख्याधिकारी, सार्वजनिक बांधकाम कार्यकारी, अभियंता तालुका कृषी अधिकारी तसेच इतर तालुकास्तरीय अधिकारी उपस्थित होते.दर्यापूर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस झालेला आहे. तालुक्यातील तीन मंडळामध्ये अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले आहे. त्याअनुषंगाने सर्वप्रथम थिलोरी येथे शेतीपिकाच्या नुकसानीची पाहणी करण्यात आली. यावेळी अतिवृष्टी झालेल्या मंडळात पंचनामे त्वरित करण्याबाबतच्या सूचना जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी संबंधितांना दिली. त्यानंतर उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसिल कार्यालयाच्या सुरु असलेल्या नवीन इमारतीच्या बांधकामास जिल्हाधिकारी यांनी भेट दिली . त्यावेळी हे काम त्वरित पूर्ण करण्याबाचतचे निर्देश कार्यकारी अभियंता सार्वजानिक बांधकाम यांना दिले .उपविभागीय अधिकारी कार्यालय, दर्यापूर येथे सर्व तालुकास्तरीय अधिकाऱ्याची आढावा सभा जिल्हाधिकारी यांनी घेतली. यामध्ये तालुक्यात सुरु असलेल्या विविध विभागांच्या विकास कामांचा आढावा घेण्यात आला.

नगरपरिषद दर्यापूर अंतर्गत, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित सुधार योजनेअंतर्गत भीमनगर येथील सभागृह बांधकामाची पाहणी करण्यात आली. शिवर रोड येथिल घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेच्या प्रकल्पासही यावेळी भेट देण्यात आली. त्याठिकाणी एम. आर. एफ शेड, व्यवस्थापन प्रक्रिया इत्यादी कामाची पाहणी जिल्हाधिकारी यांनी केली. सिध्दार्थ नगर परिसरातील वाचनालय व व्यायामशाळा या प्रगतीपथावरील कामाची पाहणी



केली.

अंजनगाव तालुक्यातील मौजा, चिंचोली खुर्द येथील भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेअंतर्गत श्रीमती अंजली वडतकर यांच्या शेतातील केसर आंबा फळबाग लागवडीची पाहणी करण्यात आली. तसेच मौजा चिंचोना येथील शेतकरी प्रमोद पवार यांच्या शेतामध्ये भेट देवून संत्रा पिकाच्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी नुकसानग्रस्त भागाचे तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना जिल्हाधिकारी कटियार यांनी दिल्या. त्यांनतर मौजा अडगाव खाडे येथील जिजाऊ मल्टीस्टेट कल्टीव्हेटर कंपनीद्वारे प्रगतीपथावर असलेल्या संत्रा प्रोसेसिंग कामाची पाहणी करून सदर काम पर्ण करण्याबाबत निर्देश दिले.

# आझाद हिंद मंडळाच्या दत्त गुरू अवतार देखाव्याचे आ. यशोमती ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन




विदर्भ प्रजासत्ताक
दि.९ अमरावती

आझाद हिंद मंडळाच्या आकर्षक देखाव्याचे लोकार्पण माजी पालकमंत्री ॲड यशोमती ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, मंडळाचे अध्यक्ष सचिन हिवसे, कार्याध्यक्ष विलास इंगोले, शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले तसेच आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मंडळाच्या स्थापनेपासून आतापर्यंतचा प्रवास दर्शवणारा लघुपट सादर करण्यात आला. यावेळी भगवान दत्ताच्या देखाव्याचा संदर्भ आणि उद्देश मांडण्यात आला. प्रास्ताविकातून माजी महापौर विलास इंगोले यांनी मंडळाचा लेखाजोखा सादर केला. यावेळी माजीपालकमंत्री ॲड यशोमती ठाकुर, दिलिपबाबू इंगोले व अन्य नेत्यांनी मनोगत व्यक्त केले. लोकार्पणाच्या कार्यक्रमाला मंडळाचे कार्याध्यक्ष माजी महापौर विलास इंगोले, माजी खा तसेच मंडळाचे उपाध्यक्ष अनंतराव गुढे, कोषाध्यक्ष डॉ. किशोर फुले, सचिव दिलीप

## सर्वत्र दत्तमय वातावरण

दाभाडे, दिलीप कलोती,लोखंडे, आकाश शिरभाते, सागर इंगोले, कोषध्यक्ष निलेश वानखडे अनिकेत नवघरे, प्रथमेश वाखडे, परेश कोरे, आकाश मोहोड, वेदांत डांगे, सतीश चौधरी, संजय मुचलंबे, प्रवीण चौधरी, राजेश जायदे, संजय कदम, उमेश देशमुख, निलेश सराफ, मयूर जलतारे, संतोष चिखलकर, राजेश ढोले, पंकज सराफ, भूषण पुसतकर, चेतन चव्हाण, राजू बोराटने, सुनिल तिप्पट, विलास बीजवे, अण्णा करणे, राजेंद्र हीरापुरकर, राजेंद्र दोड़के, बबलु शेखावत, रफीकभाई चिकूवाले, शरद देवरनकर, मोहन खोपे, संजय ढेले, बबलू दोड़के (विवेक) नितीन इंगोले, नितीन सराफ, विशाल फाटे, अमित काजनेकर, प्रा. संजय शिरभाते, सागर इंगोले, राष्ट्रवादी कांग्रेस के ,शहराध्यक्ष हेमंत देशमुख,देशमुख, शिवसेना के जिला अध्यक्ष पराग गुड़धे, सुनील खराटे, सुरेशरतावा, राजापिजरकर, मनीष काजनेकर, मनीष चौधरी, सचिन कोहले, – मुन्ना दुलारे, दीपक लोखंडे, दिलीपबाबू इंगोले, सागर इंगोले, अजय पुसतकर, अजय इंगोले, सतीश बद्रे, अमित काजनेकर, बाळासाहेब भेरडे, सागर रोहनकर, शुभम काशिकर, चेतन गुंबळे, कपिल जोशी, मिलींद कहाळे, सागर मरोडकर, तन्मय पिजरकर, आयुष वानखडे, आर्यन ढोले, प्रशांत जांभुळकर, क्रिष्णा हिवसे, अर्जुन इंगोले, हृषिकेष गाडगे, रेवन पुसतकर, राहुल चिखलकर, त अमर चावंडे आदि प्रामख्याने उपस्थित होते.

### विलास इंगोले म्हणाले, यशोमतीताई भावी मुख्यमंत्री

यावेळी बोलताना विलास इंगोले यांनी ॲड यशोमती ठाकुर यांच्याकडे भावी मुख्यमंत्री म्हणून पाहत असल्याचे मत व्यक्त केले. यशोमती ताई आमच्या नेत्या आहेत. त्या जिल्ह्याच्या पालकमंत्री राहिल्या आहेत. मी त्यांना भावी मुख्यमंत्री म्हणून पाहतो, असे ते म्हणाले. यावर यशोमती ठाकूर म्हणाल्या, विलासदादांच्या जिभेवर सरस्वती विराजमान झाली असेल तर, आझाद हिंद मंडळाच्या शताब्दी वर्षाचा संपूर्ण खर्च माझ्याकडे राहील. शताब्दी वर्षाची जबाबदारी मी घेईल.

## विघ्नहर्ता ....



राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजितदादा पवार गटाच्या जेष्ठ नेत्या सुरेखाताई ठाकरे यांच्या गणराज विराजमान झाले आहेत. दहा दिवस मोठ्या भक्तिभावाने ताईंच्या घरी पूजा अर्चना करण्यात येते.

## खोलापूर पोलिस ठाण्यात शांतता समितीची बैठक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.९ अमरावती

खोलापूर पोलिस ठाण्यात सण उत्सवानिमित्त शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन केले होते. सहायक जिल्हाधिकारी मिनू पी.एम. यांनी गणेशोत्सव मंडळ पदाधिकाऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या, तसेच गणेश विसर्जन मार्गाची पाहणीदेखील अधिकाऱ्यांनी केली.

यावेळी सहायक जिल्हाधिकारी अमर राऊत, तहसीलदार अजितकुमार येळे, भातकुली पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रफुल्ल बोरखडे, ठाणेदार किशोर वानखेडे, ग्रामविकास अधिकारी वंदना भोपाळे, सरपंच सरला इंगळे, जमीन पटेल, वसंत इंगळे, अब्दुल कयूम, ॲड. दिनेश फिसकेसह गणेश मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## सीताबाई संगई कन्या शाळेत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा सर्वेक्षण



विदर्भ प्रजासत्ताक
दि.९ अंजनगावसुर्जी

महाराष्ट्र राज्य स्तरावर सुरू असलेल्या माझी शाळा सुंदर शाळा टप्पा दोन अंतर्गत सर्वेक्षणाचे कार्य प्रशासन स्तरावर सुरू आहे. याच सर्वेक्षणाचा भाग म्हणून पंचायत समिती द्वारे येथील सीताबाई संगई कन्या शाळेत सर्वेक्षण व तपासणी करण्यात आली. या तपासणी समितीमध्ये गट शिक्षणाधिकारी भटेसिंग गिरासे, विस्तार अधिकारी सुधीर खोडे, डी डी. खंडारे,केंद्रप्रमुख रवींद्र कानेरकर, पालिकेचे शिक्षण अधिकारी गुलाब शाह यांनी अभियानांतर्गत असलेल्या निकषांप्रमाणे – पायाभूत सुविधा, शासन ध्येयधोरण अंमलबजावणी, शैक्षणिक संपादनूक, ची तपासणी केली. तपासणी झाल्यानंतर अधिकारी वर्गाने विद्यार्थी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सांघिक कार्याबद्दल व शाळेद्वारे राबवित असलेल्या विविध उपक्रमांचा व तसेच विद्यार्थिनींनी व कलाशिक्षक अतुल अस्वार यांनी रंगविलेल्या बोलक्या चित्रा बद्दल विशेष कौतुक केले. या सर्वेक्षणा दरम्यान शाळेचे मुख्याध्यापक उत्तम मुरकुटे, पर्यवेक्षिका नीलिमा सांगोळे , शाळेतील सर्व शिक्षक– शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## तान्हा पोळ्याची जमा रक्कम दिली दिव्यांगासाठी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.९आसेगाव पूर्णा

स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी तथा कर्मचाऱ्यांनी तान्हा पोळ्यात जमा रक्कम दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी दिली. यावेळी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणीही करण्यात आली.ङ्गप्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. रोशन घोडेस्वार यांच्या संकल्पनेतून मातीची बैलजोडी विकत घेऊन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तान्हा पोळ्यात तीबैलजोडी ठेवली. अधिकारी, कर्मचारी व रुग्णांनी स्वेच्छेने रक्कम दिली. ते ४,५०० रुपये आसेगाव पूर्णा येथील निवासी मतिमंद विद्यालयाला देण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्राच्यावतीने मुलांना चॉकलेट वितरण करण्यात आले.ङ्गशाळा व्यवस्थापनमार्फत या रकमेतून गतिमंद मुलांसाठी खुर्च्या घेण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी मतिमंद मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.


## स्थगीती नाही, वाढीव मालमत्ता कर सरसकट रद्दच करा

### लोकप्रतिनिधी कडून अमरावती क्षेत्रामधील मालमत्ताधारकांची दिशाभुल

विदर्भ प्रजासत्ताक
दि. ९ अमरावती

अमरावती महानगरपालिकेच्या प्रशासकीय कालावधीमध्ये सन २०२२२ मध्ये तत्कालीन आयुक्त यांनी अमरावती महानगरपालिका क्षेत्रामधील मालमत्तेमध्ये मोठ्या प्रमाणात मालमत्ता करामध्ये वाढ करण्यात आली. ७० पैसे दराचे २५ रूपये दर करण्यात आले व गैर निवासी करीता २.१० पैशाचे ४५ रूपये दर आकारण्यात आले. तत्कालीन प्रशासकाने सर्व्हेक्षण व मुल्यांकन आधीच दर निश्चित करण्यात आले. व दि. ३० जून २०२२ ला एका खाजगी कंपनी स्थापत्य कंन्सल्टंट एन.टी.एस. इंडिया प्रा.लि. या कंपनीला अमरावती शहरातील मालमत्तेचे सर्व्हेक्षण व मुल्यांकन करण्याकरीता सदर कंपनीला ठेका देण्यात आला.

अधिकारी व कंपनीच्या साठगाठ मुळे निवीदा प्रक्रीयेमध्ये अंदाजे २० कोटीचा भ्रष्टाचार इ गाला. याबाबत कृती समितीने मा. आयुक्त व पोलीस विभागामध्ये वारंवार तक्रार करूनही अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही.तसेच वाढीव मालमत्ता कराबाबतचे मंजूर करण्यात आलेल्या ठरावामध्येही मोठ्या प्रमाणात अनिमितता असल्यामुळे सदर प्रकरणात निष्पक्ष सखोल चौकशी व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी अमरावतीकरांची आहे.दि. ०५/०९/२०२४ रोजी महाराष्ट्र शासनाने अमरावती महानगरपालिकेव्दारे सन २०२४ मध्ये केलेल्या कर आकारणीस स्थगीती देण्याबाबतचे पत्र अमरावती महानगरपालिकेला प्राप्त झाले, परंतू शासनाच्या पत्रामध्ये सन २०२४ मध्ये केलेली कर आकारणी तिला स्थगिती देण्याबाबतचा उल्लेख असल्यामुळे संभ्रम निर्माण होत आहे.तत्कालीन आयुक्तांनी दि. १६/०२/२०२४ रोजी ठराव क्र. ४३० व ठराव क्र. ४३१ मंजूर करण्यात आला होता. सदर ठरावामध्ये सन २०२४–२०२५ च्या आर्थीक वर्षामध्ये अमरावती महानगरपालिका क्षेत्रामधील इमारती तथा अकृषक खुल्या भुखंडावरील दर निश्चित करण्याबाबतचा ठराव मंजूर झाला होता. तसेच मालमत्तेचे कर योग्य निश्चित करण्याबाबतचा तक्त्यामध्ये सुधारणा करण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला होता. दि.



२०/०२/२०२४ रोजी घसारा तक्त्यामध्ये सुधारणा करण्याबाबतचा १६७ ठराव क्र. मंजूर करण्यात आला होता.शासनाने सन २०२४ च्या कराच्या मुल्यांकन प्रक्रीयेला स्थगिती दिली आहे, परंतू सन २०२२ मध्ये शहरातील अंदाजन २ लाख ४० हजार मालमत्तेमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे, याबाबत शासनाने व अमरावती महानगरपालिकेने खुलासा करावा.

अमरावती नागरीक कृती समिती व्दारे सन २०२२ ते सन २०२४ पर्यंत वाढीव मालमत्ता कराच्या विरोधात अनेक आंदोलने, धरणे व निदर्शने केली असता कृती समितीच्या समितीच्या सदस्यांवर पोलीस व्दारे अनेक गुन्हे ही दाखल करण्यात आले आहेत. काही दिवसांआधीच कृती समितीने अमरावती मनपाचे नविन आयुक्त श्री. कलंत्रे साहेब यांच्यासोबत बैठक घेवून वाढीव मालमत्ता रद्य करण्याबाबतची मागणी केली होती. दि. ०६/०९/२०२४ रोजी बडनेराचे आमदार व अमरावतीच्या आमदारांनी अमरावती महानगरपालिकेचे वाढीव मालमत्ता करामध्ये स्थगिती बाबतची घोषणा केली. याबाबत आम्ही दोन्ही सन्माननीय आमदारांचे स्वागत करतो, परंतू दोन्हीही सन्माननीय आमदारांनी व मनपा प्रशासकाने निवडणूक झाल्यानंतर सदर स्थगिती कायम राहील किंवा स्थगिती उठविण्यात येणार का? याबाबत लेखी खुलासा अमरावती मालमत्ता धारकांना समक्ष करावा. तसेच अमरावती महानगरपालिकेच्या प्रशासकाने सन २०२३–२०२४ व २०२४–२०२५ तसेच मागील दोन वर्षाची थकीत मालमत्ता कोणत्या दराने वसुल करणार आहे याबाबतचा सुध्दा खुलासा करावा.अमरावती नागरीकांमध्ये या स्थगितीला घेऊन संभ्रम निर्माण झालेला आहे, होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणूकीपर्यंतच ही स्थगिती राहणार आहे का?अमरावती व बडनेरा विधान सभेचे सन्माननीय आमदार यांनी मागील अडीच वर्षापर्यंत वाढीव मालमत्ता कराबाबत सत्तेमध्ये असतांनाही सदर गंभीर प्रश्न निकाली का काढण्यात आला नाही?

दोन वर्षाआधीच वाढीव मालमत्ता कराबाबत अमरावती महानगरपालिकेच्या प्रशासकाने सर्व्हेक्षण व मुल्यांकना करीता नेमण्यात आलेल्या खाजगी कंपनीला आज तारखेपर्यंत देण्यात आलेल्या १० ते १२ कोटीच्या नुकसानाला जबाबदार कोण? वेळे अभावी सन्माननीय आमदारांनी वाढीव मालमत्ता कराबाबत पाठपुरावा करून रद्य केला असता तर मागील दोन वर्षामध्ये अमरावती महानरपालिकेच्या वार्षीक आर्थीक बजेट मध्ये झालेला गोंधळ हा थांबविता आला असता.महानगरपालिकेने सन २०२२–२०२३ ते २०२४–२०२५ अमरावती महानगरपालिकेच्या बजट मध्ये अंदाजे ५०० ते ६०० कोटी रूपयांचे उत्पन्न अपेक्षीत असतांना खर्च पण अपेक्षीत उत्पन्ना प्रमाणे करण्यात आले, परंतु शासनाच्या स्थगितीमुळे महानगरपालिकेला मात्र ३५ कोटी रूपये हाऊस टॅक्स मिळण्याचे संकेत आहेत, त्यामुळे अमरावती महानगरपालिका ही पूर्णपणे व्हेंटीलेटरवर असल्याचे सिध्द होत आहे. करीता मनपाचे नविन आयुक्त श्री. कलंत्रे साहेब व सन्माननीय दोन्ही आमदारांनी लेखी खुलासा करावा.

मालमत्ता स्थगितीच्या आदेशामुळे साफसफाई व्यवस्था, विकास योजना, महावितरणचे थकीत, मनपा वाहनाचे इंधन, जीवन प्राधिकरणचे थकीत, कर्मचा–यांचे वेतन थकीत अशा अनेक समस्यांबाबतचा निपटारा नविन मनपा आयुक्त व दोन्ही सन्माननीय आमदार कसे करणार याबाबतचा खुलासा करण्यात यावा.अमरावती नागरीक कृती समिती शहरातील दैनोदिन साफसफाई व्यवस्था, वाढीव मालमत्ता कर व महानगरपालिकेमध्ये झालेला भ्रष्टाचार याबाबत मागील अडीच वर्षापासून अविरत आंदोलन करीत आहेत, तसेच वाढीव मालमत्ता कर रद्य करण्यात यावा याबाबत मा. उच्च न्यायालयात सुध्दा पाठपुरावा करीत आहेत.

वाढीव मालमत्ता कराबाबतचा सन २०२२ चा ठरावच रद्य करण्यात यावा याबाबत कृती समितीचे आंदोलन सुरूच राहणार आहे.असे मुन्ना राठोड समिर जवंजाळ, रामा सोळंके, रश्मी नावंदर, संजय गव्हाळे प्रविण डांगे, देवा राठोड, किशोर डोळे, योगेश बुंदेले, निलेश देशमुख, संभाजी पेठे, जितेंद्र भैसे, आशिष हरणे यांनी जाहीर केले.

## अचलपूर मतदार संघातील देवस्थानांचा होणार कायापालट; आ .बच्चू कडू यांचा पाठपुरावा : दहा तीर्थक्षेत्रांना करोडोंचा निधी मंजूर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.९ अमरावती

अचलपूर विधानसभा मतदारसंघातील ब दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी वाढीव निधी मिळावा यासाठी दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे अध्यक्ष व आमदार बच्चू कडू यांनी राज्य सरकारकडे सातत्याने पत्रव्यवहार करीत पाठपुरावा केला. त्यांच्या या पाठपुराव्यास मोठे यश मिळाले असून तब्बल दहा तीर्थक्षेत्रांना करोडो रुपयांचा वाढीव निधी निधी मंजूर झाला आहे. राज्याच्या ग्रामविकास विभागाने या संदर्भातील शासन आदेश जारी केला असून या निधीमुळे मतदार संघातील देवस्थानांचा कायापालट होणार आहे .अचलपूर विधानसभा मतदारसंघात अनेक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असून या तीर्थक्षेत्रांचा विकास व्हावा यासाठी आमदार बच्चू कडू हे सातत्याने प्रयत्न करत आहे. त्यांच्या या प्रयत्नांमुळे तब्बल दहा तीर्थक्षेत्रांना ब दर्जा मिळून विविध विकास कामे करण्यासाठी पूर्वीच्या तरतुदीनुसार निधी प्राप्त होऊन विकास कामे झाली होती. परंतु अपुर्या निधीमुळे तीर्थक्षेत्र विकासाची अनेक कामे पूर्ण होऊ शकली नाही. आपल्या मतदारसंघातील तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी कटिबद्ध असलेल्या आमदार बच्चू कडू यांनी सर्व तीर्थक्षेत्रांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रा स्थळ व तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत वाढीव निधी मंजूर करण्यात यावा अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे एका पत्राद्वारे केली होती. मुख्यमंत्र्यांनी या पत्राची दखल घेत दहा तीर्थक्षेत्रांना वाढीव निधी मंजूर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार राज्याच्या ग्रामविकास विभागाने नुकताच एक शासन आदेश जारी केला असून अचलपूर मतदारसंघातील श्री क्षेत्र बेलोरा तीर्थक्षेत्रासाठी २ कोटी ९९ लाख ,श्री क्षेत्र लाखनवडी ३ कोटी, श्री शेत्र देऊरवाडा ३ कोटी, श्री क्षेत्र चंद्रपुरी महाराज संस्थान बेसखेडा ३ कोटी, श्री क्षेत्र तुळजामाता देवस्थान घाटलाडकी ३ कोटी ,श्री शेत्र गुलाबराव महाराज देवस्थान माधान २ कोटी ९९ लाख ,श्री शेत्र शिरसगाव कसबा २ कोटी ९९ लाख, श्री क्षेत्र गुलाबराव महाराज संस्थान प्रल्हादपूर चांदूर बाजार ३ कोटी, श्री क्षेत्र बहिरम बाबा संस्थान कारंजा बहिरम ३ कोटी आणि धानोरा येथील श्री क्षेत्र सुंदरनारायण संस्थान या तीर्थक्षेत्रास ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार बच्चू कडू यांनी देत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले .

### भाविक व यात्रेकरूंना मिळणार सुविधा



अचलपूर विधानसभा मतदारसंघातील ब दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी वाढीव निधी मंजूर झाल्यामुळे आता प्रत्येक ठिकाणी बहुउद्देशीय हॉल, किचन, टॉयलेट ,विद्युतीकरण ,पेविंग ब्लॉक ,अंतर्गत रस्ते असे विविध कामे पूर्ण करण्यात येणार असून या विकास कामांमुळे दर्शनासाठी येणार्या भाविकांना व यात्रेकरूंना सोयी सुविधा उपलब्ध होतील अशी प्रतिक्रिया आमदार बच्चू कडू यांनी देत यातील काही तीर्थक्षेत्रांना अ दर्जा प्राप्त व्हावा यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करीत असल्याचे सांगितले.

### प्रल्हादपूर येथील संत गुलाबराव महाराज संस्थान भक्तीधाम विकासासाठी ३३ कोटी रुपये मंजूर

प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज यांच्या पावन स्पर्शाने पवित्र झालेल्या



प्रल्हादपूर येथील श्री क्षेत्र गुलाबराव महाराज संस्थान भक्तीधाम या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी रुपये आणि दुसर्या टप्प्यात ८ कोटी असे एकूण ३३ कोटी रुपये निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार बच्चू कडू यांनी दिली. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत भक्तीधामच्या विकासासाठी मोठा निधी देण्याचा निर्णय झाला असून या निधीतून अनेक विकास कामे करून भक्तीधामला जागतिक दर्जा प्राप्त करून देण्याचा आपला प्रयत्न असल्याचे आमदार बच्चू कडू म्हणाले.

# आमचा जीव गेल्यावर खड्डे बुजवाल का? संतप्त नागरिकांचा सवाल : वलगाव रेल्वे पुलावर जिवघेणे खड्डे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील वलगाव येथील रेल्वे पुलावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहे ऐक ते दिड फुटापर्यंत हे खड्डे आहेत खड्ड्यांमुळे फुलाच्या सलाखा देखील उघड्या पडल्या आहेत याच पुलावरून अनेक दुचाकी चालक व चारचाकी चालक दर्यापूर अंजनगाव सुर्जी परतवाडा धारणी चिखलदरा चांदूरबाजार या तालुक्यात प्रवास करत असतात खड्ड्यांमुळे पुलावर मोठा अपघात होऊ शकतो याची शक्यता नाकारता येत नाही याच खड्ड्यांमुळे वलगाव पोलीस स्टेशन येथील दोन पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले होते पुलाच्या बांधकामावर मोठ्या प्रमाणात प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे सार्वजनिक बांधकाम विभाग व रेल्वे



विभाग याकडे वारंवार दुर्लक्ष करत आहे सामान्य नागरिकाचा जीव गेल्यावर हे खड्डे बुजवणार का असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत.

**वाहनावरील नियंत्रण सुटते**

वाहनचालक दिनेश यांनी सांगितले की, रेल्वेपुल मार्गावर असलेले खड्डे जीवघेणे ठरत आहे. हा शहरातील मुख्य वर्दळीचा मार्ग असल्यामुळे वाहनांची नेहमीच गर्दी राहते. यातच या ठिकाणी खड्डे व खडी पसरली असल्यामुळे ते वाचवण्याच्या नादात वाहनावरील नियंत्रण सुटते. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे.

# आपले सरकार पोर्टल २.० बाबत जिल्हास्तरीय शासकीय विभाग प्रमुखांना प्रशिक्षण

## नागरिकांच्या तक्रारींचे गुणवत्तापूर्ण निराकरण करण्यासाठी आपले सरकार पोर्टल उपयुक्त : जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**



सर्वसामान्य नागरिक हा आपल्या शासन, प्रशासनाचा केंद्रबिंदू आहे. त्यांच्या तक्रारींचे गतीने आणि गुणवत्तापूर्ण निराकरणासाठी 'आपले सरकार पोर्टल २.०' ही प्रणाली उपयुक्त आहे. या प्रणालीद्वारे प्राप्त तक्रारींचा निपटारा विहित कालावधीत करण्याला सर्व शासकीय विभागांनी प्राधान्य देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी आज येथे दिल्या.

आपले सरकार पोर्टल २.० प्रणालीच्या वापराबाबत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी जिल्हाधिकारी श्री. कटियार बोलत होते. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, अपर जिल्हाधिकारी सुरज वाघमारे, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सागर पाटील, कल्पना बारवकर, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, तहसीलदार वैशाली पाथरे तसेच प्रशिक्षक देवांग दवे, शुभम पै यांच्यासह जिल्हास्तरीय शासकीय विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

नागरिक आणि प्रशासन यांच्यात ऑनलाईन संवादाच्या माध्यमातून सेतू निर्माण करण्यासाठी आपले सरकार पोर्टल अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. तक्रारींचा निपटारा गतिमान होण्यासाठी आपले सरकार पोर्टलमध्ये नव्याने काही बदल करण्यात आले आहेत. या माध्यमातून नागरिकांच्या तक्रारींचा संवेदनशीलपणे निपटारा होण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या संकल्पनेतून आपले सरकार पोर्टलबाबत राज्यभर जिल्हास्तरीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणातून प्रणालीचा प्रभावी वापर कशाप्रकारे करावा, याबाबत यावेळी माहिती दिली गेली. या माहितीचा वापर प्रत्यक्ष कामकाजात करून नागरिकांच्या तक्रारींचा तातडीने निपटारा करावा, असे जिल्हाधिकारी श्री . कटियार यांनी सांगितले.

नागरिकांना आपल्या तक्रारी घरातून, गावातूनच शासन, प्रशासनापर्यंत पोहचविता याव्यात, यासाठी आपले सरकार पोर्टल सुरू करण्यात आले. आता नागरिक आणि शासकीय यंत्रणांसाठी सुसह्य ठरतील, अशा सुधारणा करून 'आपले सरकार पोर्टल २.०' हे नवीन पोर्टल सुरू करण्यात आले आहे. कामकाजातील पारदर्शकता वाढविण्यासाठी हे पोर्टल उपयुक्त ठरणार आहे, असे प्रशिक्षक देवांग दवे यांनी सांगितले. तसेच शासकीय कार्यालये, नागरिकांना या पोर्टलचा कशाप्रकारे वापर करता येईल, याबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

# बच्चू कडुंचा शेती बांधावरून थेट जिल्हाधिकाऱ्यांना फोन, घरी घुसण्याचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९परभणी**

परभणीत आमदार बच्चू कडू यांनी जिल्हाधिकाऱ्यांना झापलं आहे. बच्चू कडूंनी जिल्हाधिकाऱ्यांना फोन करुन झापलं. नदी काठावरचं पहिलं घर, तरी त्याला सानुग्रह अनुदान नाही. तलाठ्याकडून ३ तारखेला केलेले पंचनामे ९ तारखेपर्यंत दाखल नाहीत. अन्यथा तुमच्या घरी येऊन बसावं लागेल, असा इशारा कडुंनी दिला. बच्चू कडू मानवतमधील रामेटाकळीमधील नुकसानीची पाहणी करत होते. यावेळेस त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना फोन करुन झापलं. यावेळेस कडुंसोबत संभाजीराजे आणि राजु शेट्टीही उपस्थित होते.

# वाढोण्यात गावगाड्याचे राजकारण ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे पगार थांबले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९वाढोणा रामनाथ :**




स्थानिक ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांचे पगार झालेले नाहीत. कारण गावगाड्याच्या राजकारणात सरपंचाच्या नावे बँक खातेबदल करण्याचा ठराव नामंजूर झाला. दोन महिन्यांपूर्वीच पदावर विराजमान झालेल्या सरपंचाच्या गोटात पाच, तर विरोधात सहा सदस्य आहेत.

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील वाढोण्याच्या सरपंचपदी दोन महिन्यांपूर्वी सविता तिरमारे यांची निवड झाली. तेव्हापासून बँक खातेबदल रखडला. त्यामुळे गावातील संपूर्ण विकासकामे थांबली आहेत. ग्रामपंचायतमध्ये एकूण अकरा सदस्य आहे.

त्यापैकी पाच सदस्य सरपंच तिरमारे यांच्याकडे, तर सहा सदस्य विरोधात आहेत. ग्रामपंचायतीच्या मासिक सभेमध्ये बँक खातेबदल करण्यासाठी ठराव नामंजूर करण्यात आला. त्यामुळे ग्रामविकास अधिकारी वाघोडे यांनी तसा अहवाल गटविकास अधिकाऱ्यांकडे पाठविला. पंचायत समितीने जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव पाठविला. परंतु, आजपर्यंत त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही.

त्यातच कर्मचाऱ्यांचे पगारसुद्धा झाले नाही. सरपंचांना पैसे खर्च करण्याचे अधिकार नाहीत. वाढोण्यात गेल्या तीन वर्षांपासून सरपंचपदासाठी न्यायालयीन वाद झडत आहेत. तो अजूनही थांबला नाही. जिल्हा परिषद यावर कुठली कायदेशीर कारवाई करणार, याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# बार्शीत मराठा समाज करणार मनोज जरांगें विरोधात आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ सोलापूर**

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे या मागणीसाठी सातत्याने उपोषण आंदोलन करून मनोज जरांगे पाटील राज्यभरात चर्चेत आले. त्यांच्या आंदोलनामुळे राज्य सरकारने विशेष अधिवेशन घेऊन मराठ्यांना १० टक्के स्वतंत्र आरक्षण मंजूर केले. मात्र ओबीसीतूनच आरक्षण हवं ही मागणी जरांगेंनी कायम ठेवली. मात्र आता सोलापूरातील बार्शी इथं मराठा समाजाकडूनच मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात आंदोलनाची हाक देण्यात आली आहे.

मराठा समाजाचे स्थानिक नेते अण्णासाहेब शिंदे यांच्या नेतृत्वात जरांगे पाटलांविरोधात १ दिवसीय ठिय्या आंदोलन करण्यात येणार आहे. मनोज जरांगे यांना विचारलेल्या १० प्रश्नांची उत्तरे न मिळाल्याने शिंदे यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. अण्णासाहेब शिंदे म्हणाले की, तुम्ही आमचे नेते आहात, आम्ही तुम्हाला काही शंका विचारली त्यावर तुम्ही राजेंद्र राऊत, देवेंद्र फडणवीसांवर बोलले परंतु आम्ही काय विचारतोय त्यावर उत्तर दिले नाही. तुम्हाला समाजाने काही शंका विचारायची नाही का?, समाजाने तुम्हाला काय प्रश्न विचारायचे नाहीत का? समाजातून काही प्रश्न आले, ते आम्ही विचारल्यावर तुम्ही उत्तर न देता त्यात राजकारण का घातलं? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.



तसेच मी विचारलेल्या प्रश्नावर माझ्या शंकेचे निरसन तुम्ही करायला हवे होते. मला समाजाचं काम करायचंय, महाविकास आघाडीचे कार्यकर्ते मराठा म्हणून जरांगेंना भेटायला गेले. त्यात काही गावचे सरपंच, पंचायत समितीचे माजी सदस्य, अनेक महिलांचे पैसे खाणारे, मनोज जरांगेंच्या नावाखाली पैसे घेतले असे लोक गेले होते. मात्र यांचा समाजाशी काही संबंध नाही. मूळ मुद्दा विषय जरांगेंनी बाजूला केले. आम्ही १० शंका विचारल्या त्यावर तुम्ही उत्तर द्यायला हवं होतं. तुम्ही सांगितल्याप्रमाणे आम्ही महायुतीला मतदान केले नाही, महाविकास आघाडीला मते दिली. मग ३१ खासदार ज्या पक्षाचे निवडून गेलेत तुम्ही त्यांच्यावर एक शब्दही का बोलत नाही? तुम्ही तुमचा पक्ष काढा मरेपर्यंत आम्ही तुमच्यासोबत राहू असं अण्णासाहेब शिंदे यांनी म्हटलं.

दरम्यान, बार्शीत येऊन उत्तरे द्या असं मी जरांगेंना म्हटलं का? तुम्हाला मराठाविरुद्ध मराठा दंगली घडवायच्या आहेत का? तुम्ही बार्शीत येताय, बार्शी तालुक्यात तुम्हाला मराठा समाजाचा आमदार ठेवायचा नाही का? उद्योगधंदे करणाऱ्या पोरांच्या हातात तुम्ही कटोरा देणार का? या पोरांची जबाबदारी जरांगेंनी घ्यावी मग बार्शीत यावे. १९९४ साली शरद पवारांनी मराठ्यांचे किती वाटोळे केले हे तुम्हाला माहिती आहे आणि सगळ्या महाराष्ट्राला माहिती आहे तरीपण तुम्ही त्यांना फायदा पोहचवताय. कळत-नकळत आपला महाविकास आघाडीला फायदा होतोय. तुमच्या धोंगडी बैठकीमुळे जातीजातीत तेढ निर्माण व्हायला लागला आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेनेचे काही तरूण दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करतायेत. जरांगेविरोधात कुणी बोललं तर सर्व स्तरावर त्याला दडपण्याचा प्रयत्न केला जातो असंही अण्णासाहेब शिंदे यांनी सांगितले.

# महाप्रसादाचे शिल्लक अन्न, उष्टान्नाची विल्हेवाट लावण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

सण उत्सवाच्या काळात महाप्रसाद तसेच ठिकठिकाणी उठणाऱ्या पंगतील उष्टान्नाची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्याचे आवाहन एम.एच. - २७- एटीएस ग्रुपच्या सदस्यांनी केले आहे.

गणेशोत्सव, महालक्ष्मी, नवरात्री उत्सवात प्रसाद, महाप्रसादाचे वितरण केले जाते. अन्नाचा प्रत्येक दाणा अन् दाणा पिकवण्याकरिता शेतकरी रात्री अपरात्री चिखल तुडवत, काबाडकष्ट करतो. त्या अन्न धान्याचा, अन्नदेवतेचा आणि शेतकऱ्याचा आदर म्हणून महाप्रसादानंतर, शिल्लक राहिलेले अन्न इतरत्र कुठेही न टाकता ते खाण्यायोग्य. असेल तर, गरजू, गोरगरीब कुटुंबापर्यंत पोहचते केले जाईल. मुक्या जनावरांना खाण्यायोग्य असेल तर, त्यांना दिले जाईल आणि मानव व प्राण्यासखाण्यायोग्य नसेल ते धरतीमातेला अर्पण केले जाईल. त्यासाठी ८९७५५२६९६८, ९३७२५२३४३३, ७७४४८९७९८६,९३७०३४५५९९, ९३२६९८५६२५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन प्रमोद पांडे, छाया किशोर कडु, संगिता आगाशे, संगिता गजभिये, माधुरी समिर चौधरी, निलिमा आनंद केने, कपूर, जयश्री निंभोरकर, अंजली प्रमोद पांडे, अरुणा साकरकर, छायाताई धर्माळे, निता अनिरुद्ध क्षिरसागर, मंजिरी पाठक, गुंबळे, देशमुख, बिजवे, पिंकी चांदवानी, बडणखे, पूजा दाते, प्रा. प्रविण गुल्हाने, पाटणे, जोशी; पाल, गुप्ता, डाहणे, धजेकर, भटकर, वाघ, महल्ले, राऊत, राणे, पाटील, वानखेडे, पुनम नानवानी, भोयर, प्रा. समिर चौधरी आदींनी केले आहे.



# कानठाळ्या बसविणारा आवाज, लेझर लाईटवर प्रतिबंध घाला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ नागपूर**

ध्वनी प्रदूषणाविरोधात कायदा असूनही पोलीस व जिल्हा प्रशासन त्याची अंमलबजावणी करीत नाही. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले व रुग्णांना त्रास होतो. अलीकडे लेझर लाईटचे समाजात फॅड आलेले आहे. या डोळ्यांवर विपरित परिणाम करणाऱ्या लेझर लाईट व कानठाळ्या बसविणाऱ्या आवाजावर सरसकट प्रतिबंध घालण्याची मागणी ग्रीन प्लॅनेट सोसायटीने सरकारकडे केली आहे.

ध्वनी प्रदूषण नियंत्रण कायदा २००० अस्तित्वात आहे. त्यात कडक नियम घालून दिलेले आहेत, पण लोक त्यांचे पालन करीत नाही. दवाखाने, शाळा, न्यायालये अशा संवेदनशील ठिकाणी मोठा आवाज करू नये असे नियम आहेत. नियमाप्रमाणे उद्योग क्षेत्रात ७०-७५ डेसिबल, व्यावसाईक क्षेत्रा ५५-६५ आणि रहिवासी क्षेत्रात ४५-५५ डेसिबल आणि सायलेन्स झोनमध्ये ४० ते ५० डेसिबलची मर्यादा आहे. सर्वसाधारण मर्यादा ६० डेसिबल असावी. परंतू सन आणि उत्सवात डीजेचा आवाज १०० डेसिबल किंवा त्याहून अधिक असतो. याविरोधात कठोर कारवाई होत नाही. सरकारने कायद्याच्या कठोर अंमलबजावणीसाठी




पाऊल उचलावे, अशी मागणी ग्रीन प्लॅनेट सोसायटीचे प्रा. सुरेश चोपणे यांनी मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे केली आहे.

**ध्वनी प्रदूषणाचे परिणाम**

कानाचे पडदे फाटणे, कानात सतत आवाज येत असणारा टीन्नीटसं विकार, रक्त दाब वाढणे, हॉर्ट अटॅकचा धोका आणि मानसिक समस्या निर्माण होतात. घटनेच्या क्रिमिनल प्रोसिजर कोड, सेक्शन १३३ नुसार सार्वजनिक ठिकाणी आवाजाचा गोंधळ घालून लोकांना त्रास देणे हा गुन्हा आहे. इंडियन पिनल कोड चॅप्टर १४- कलम २६८, २८७, २९०, २९१ आणि २९४ नुसार अश्या नागरिकावर कारवाही करता येते.

**लेझर लाईटच्या वापरावर हवे नियंत्रण**

लेझर लाईट हे डोळ्यांसाठी अतिशय धोकादायक आहे. व्हीझीबल आणि इन्फ्रारेड लाईट, ४०० ते १४०० नानोमिटर लेझर लाईट बीम ही डोळ्याच्या रेटीनासाठी धोकादायक आहे. यामुळे डोळ्याच्या रेटीनल, फोटो केमिकल आणि कॉर्नियलला न भरून निघणारी इजा होते. ४००-५०० नेनोमिटर रेंज मधील अर्गोन आणि व्हेग लेझर हे विशेषता डोळ्यासाठी धोकादायक आहे. क्लास २ व्हीसिबल लाईटच्या सतत वापरानेसुद्धा धोका होऊ शकतो. सार्वजनिक ठिकाणी वापरल्यास विमान संचालनासाठी सुद्धा धोकादायक असल्याने डीजीसीएने त्यावर बंदी घातली आहे.